


# क्रांतीचें पुढचें पाऊल

★

दादा धर्माधिकारी



क्रांतीचें—

# पुढचें पाऊल

( भू-दान-यज्ञावरील एक भाषण )

—आचार्य दादा धर्माधिकारी

# प्रस्तावना

दादांच्या लिखाणाला प्रस्तावनेची गरज च नाहीं. दादा भू-दान-यज्ञाच्या मूलभूत कल्पनेंत अगदीं मुरलेले आहेत. 'तुरत दान महापुण्य' अशा भावनेनें ते बोलत च नाहींत. 'नित्य दान पापच्छेद' अशी त्यांची भूमिका असते. विचाराच्या कसोटीवर कसून विषयाची मांडणी ते करतात. त्यामुळें ऐकणाऱ्यावर आक्रमण होत नाहीं आणि तो प्रसन्न होतो.

भू-दान-यज्ञाच्या कल्पनेनें आतां जनमनाचा ठाव घेतलेला आहे. बिहारमध्यें तरी आज अशी स्थिति आहे कीं लोकांपाशीं कुणीं हि पोंचावें आणि जमीन मिळवावी. पण कुणीतरी पोंचून जमीन मिळविण्यानें भू-दान-यज्ञाचें कार्य होणारें नाहीं. ज्यांना नेमका विचार कळला आणि पटला अशांनीं लोकांजवळ पोंचायला पाहिजे. युक्ति-बुद्धीनें भरलेले आणि सेवा भावनेनें भारलेले कार्यकर्ते चारी बाजूला पोंचायला हवेत. असे कार्यकर्ते निर्माण करण्याच्या कामीं दादांचें लिखाण उपयोगी होईल अशी मला आशा आहे.

भू-दान-यज्ञाला मीं "धर्म-चक्र-प्रवर्तन" असें नांव दिलें आहे. परिशुद्ध विचाराच्या पायावर च धर्म-चक्र-प्रवर्तन होऊं शकतें. परिशुद्ध विचाराला शब्द-योजना देखील नेमकी लागते. नेमकी शब्द-योजना रूजु बुद्धीला सहज साध्य होते, दादांची रूजु बुद्धि असल्यामुळें ते नेमका विचार ग्रहण करतात आणि त्यासाठीं नेमकी भाषा त्यांना स्फुरते. दादांचा योग विद्वत्तेचा नाहीं रुजुतेचा आहे. वाचकांनीं तशा च रुजुतेनें दादांच्या या लिखाणाचें चिंतन मनन करावें म्हणजे अपेक्षित लाभ पदरांत पडेल.

—विनोबा

# क्रांतीचें पुढचें पाऊल

## : १ :

## क्रांतीचें पुढचें पाऊल

भूदान-यज्ञ चळवळीचा एका वाक्यांत उद्देश हा कीं, आम्ही गरीबांची मालकी कायम करूं अिच्छितों. आज त्यांची हुकुमत (सत्ता) कायम झालेली आहे. ह्या हुकूमतीमार्फत ह्या देशाच्या जमीन आणि दौलत ह्यावर त्यांची मालकी कायम झाली पाहिजे.

सर्वप्रथम गरिबांच्या हुकूमतीचा अर्थ समजून घेतला पाहिजे. घटना समितीची बैठक चालू असतां सुरवातीला कांहीं देशहितैषी मित्रांनीं आग्रहपूर्वक असें प्रतिपादन केलें कीं, दुसरें कांहीं हि करा वा न करा, पण दिल्लीला स्वतंत्र भारताची राजधानी होऊं देऊं नका. त्याचें कारण त्यांना विचारलें असतां ते म्हणाले कीं,

"ह्या दिल्लींत आजपर्यंत कोणत्या हि राजाचें किंवा सम्राटाचें राज्य टिकलें नाहीं, तुमचें हि टिकणार नाहीं. दिल्ली नगरी मोठी अभागिनी आहे."

त्यांना उत्तर दिलें कीं, हा तर दिल्लीचा दोष नसून गुण आहे. कोणता हि राजा, सम्राट किंवा बादशहाची सत्ता ती सहन करीत नाहीं. दिल्ली मोठी भाग्यवती व सुलक्षणा नगरी आहे. म्हणून च तिनें राजाची राजधानी होणें पसंत केलें नाहीं. आज ती भारत वर्षाच्या लोकराज्याची 'लोकधानी' झाली आहे. राजे व राजवंश पैदा होतात व नष्ट होतात. राज्यें व राजघराणीं उदयास येतात व लोप पावतात, पण देशाची जनता गंगेच्या धारेप्रमाणें आणि चंद्रसूर्याप्रमाणें अमर असते. 'राज'धानी दिल्ली ह्या देशाची पुण्यनगरी नव्हती, 'लोक'धानी दिल्ली स्वतंत्र हिंदुस्थानची

अमरपुरी आहे. त्या पवित्र नगरींत लोकांच्या सिंहासनाची प्राण-प्रतिष्ठा झाली आहे आणि त्या पवित्र भूमीचें प्रोक्षण आमच्या राष्ट्रपित्यानें आपल्या परमपवित्र रक्तानें केलेलें आहे.

## लोक-राज्याचीं लक्षणें

लोकराज्याचा पहिला परिणाम हा कीं हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि सदियेपासून द्वारकेपर्यंत आतां ह्या देशांत कोणी राजा म्हणून नाहीं. पांच सात वर्षांपूर्वी असा शुभ दिन इतक्या लवकर येईल अशी कोणाला कल्पना नव्हती. आज दिल्लीच्या सिंहासनावर कोणत्या हि व्यक्तीचा अधिकार नाहीं. तलवारीच्या जोरावर कोणी कबजा करूं शकत नाहीं, किंवा पैशाच्या जोरावर तें कोणी विकत घेऊं शकत नाहीं. राजेन्द्रबाबू व जवाहरलालजी दिल्लीच्या खुर्चीवर आहेत, पण स्वतःच्या मर्जीनें नव्हे तर गरीबांतल्या गरीब नागरिकांच्या परवानगीनें व संमतीनें. त्यांच्या पश्चात् त्यांचा मुलगा किंवा मुलगी त्यावर बसूं शकत नाहीं. ते स्वतःदेखील फिरून लोकांची संमति घेतल्याशिवाय त्या खुर्चीवर बसूं शकत नाहींत. लोकराज्याचें हें पहिलें लक्षण आहे.

दिल्लीच्या सिंहासनावर राष्ट्रपति बनलेल्या माणसाचा जेवढा अधिकार आहे, तेवढा च राष्ट्रपति भवनाची झाडलोट करणाऱ्या भंगिणीचा हि आहे. प्रधान मंत्र्याचा जेवढा अधिकार तेवढा च कचेरी झाडणाऱ्या फरासाचा आहे. बिरला, टाटा, डालमियांचा जेवढा अधिकार आहे, तेवढा च बाजारांत व स्टेशनवर ओझीं वाहणाऱ्या मजुरांचा हि आहे. हें लोकराज्याचें दुसरें लक्षण आहे.

गरीब राजा झाला आहे च, हें पहिलें पाऊल आम्हीं टाकलें आहे. तें आम्ही मागें घेऊं इच्छित नाहीं. जो गरीब राजा झाला

आहे, तो आतां मालक हि बनावा असें दुसरें, पुढचें पाऊल आम्ही टाकूं इच्छितों.

कांहीं लोक म्हणतात कीं 'गरीबाला मालक बनवावयाचे असेल तर त्याची सत्ता काढून घ्या. लोकशाहीच्या वातावरणांत व लोकशाहीच्या द्वारें आर्थिक क्रांति होऊं शकणार नाहीं.' त्याचा हेतु असा कीं, गरीबाला सुखी करूं इच्छित असाल तर त्यांचें स्वातंत्र्य काढून घ्या. हा त्यांचा सल्ला आम्हांला पुढें नेणारा नव्हे, मागें खेंचणारा आहे. लोकशाही हा राज्यशास्त्राचा आधुनिकतम शोध आहे. लोकशाहींतून अधिक चांगलें राज्य करण्याचा प्रकार मनुष्याला अजूनपर्यंत सांपडला नाहीं म्हणून आम्ही लोकशाही कायम ठेवून लोकांचें स्वामित्व स्थापन करूं इच्छितों.

## श्रीमंताचा कुत्रा देखील चैनीनें जगतो

एक प्रसंग आहे. रेल्वेंत दुसऱ्या कोणत्या वर्गांत जागा न सांपडल्यामुळें एक अडाणी गृहस्थ पहिल्या वर्गाच्या डब्यांत बसला. त्या च डब्यांत एक आधुनिक सुशिक्षित मुलगी बसली होती. तिचा थाटमाट, वर्तन, व व्यवहार अगदीं अद्यतन पद्धतीचा होता. आपल्याला त्या मुलीवर टीका करावयाची नाहीं. शहरांत राहणाऱ्या लोकांच्या घरोघरीं, व आमच्या घरांत हि अशा मुली आहेत. त्या मुलीच्या मांडीवर तिचें एक लाडकें कुत्रें होतें. मुलगी त्याला वारंवार केव्हां टॉफी, तर केव्हां केक किंवा बिस्कुट खाऊं घालत होती. आपण जाणतां च कीं मनुष्याचें डोकें रिकामें असलें कीं त्यांत बहुधा सैतान च यावयाचा, देव चुकूनसुद्धां यावयाचा नाहीं. कमींत कमी माझी अशी स्थिति आहे. त्या अडाण्याची हि तशी च गत झाली. बसल्या-बसल्या त्याच्या मनांत विचार आला कीं मी ह्या मुलीचें कुत्रें असतों तर काय झालें असतें ?

तुमचे मेंदु मोठे आहेत म्हणून तुमच्या कल्पना हि उच्च. कोणी विचार करतो 'मी स्टॅलिन असतों तर काय केलें असतें,' कोणी विचार करतो 'मी जवाहरलाल असतों तर यूं केलें असतें त्यूं केलें असतें.' 'मी बागवान असतों तर गुलाबाचा बगीचा च लुटवून दिला असता!' अशा प्रकारें आपले मेंदु मोठे म्हणून आकांक्षा हि मोठ्या. पण हा गरीब असा विचार करीत होता कीं, ह्या मुलीचें कुत्रें मी असतों तर काय केलें असतें? त्या बिचाऱ्याचा मेंदू च त्या बेताचा होता.

तीन फायदे तर साफ दिसत होते. ह्या वयांत आपलीं मुलें मोठीं झालेलीं असतात. व आपापलीं अलग घरें करतात. अशा वेळीं डोकें टेकण्यास ह्या मुलीच्या मांडीसारखी जागा मिळाली तर केवढा मोठा लाभ! भगवंताचें मोटें वरदान च समजा. हा झाला एक फायदा. दुसरा हा कीं, थोड्या च वेळांत वरचेवर पक्वान्नें आणि स्वादिष्ट वस्तु खाण्यास मिळत्या व तिसरा सर्वांत मोठा फायदा हा कीं, हाडाच्या तुकड्यासाठीं गल्ल्या गल्ल्या धुंडीत बसावें लागतें ना! म्हणून अडाणी माणसाला वाटूं लागलें कीं कुत्रें बनलों तर मी फायद्यांत राहीन.

इतक्यांत त्याच्या हृदयाच्या गाभाऱ्यांत दडून बसलेला माणूस गंभीर आवाजानें त्याला विचारूं लागला, 'कायरे भगवान् प्रसन्न होऊन जर तुझ्यासमोर आले व म्हणाले वरदान माग तर तूं काय म्हणशील 'मला ह्या मुलीचें कुत्रें कर?' आंतून अधिक निश्चित आणि अधिक गंभीर आवाज निघाला कीं मुलीचें कुत्रें बनून पक्वान्नें खाण्यापेक्षां स्वतंत्र आणि गरीब माणूस राहणें हें च अधिक श्रेयस्कर.

# गरीब : स्वतंत्र अथवा सुखी ?

जे लोक स्वाधीनतेपेक्षां आराम, व स्वातंत्र्यापेक्षां सुख अधिक पसंत करतात त्यांना आराम हि मिळत नाहीं व ते स्वतंत्र हि राहत नाहींत. स्वातंत्र्य आणि सुख दोन्ही गमावून बसतात. गरीब लोकांच्या सुखासाठीं आणि आरामासाठीं आम्ही त्यांच्या स्वातंत्र्याचीं किंमत देऊं इच्छित नाहीं. मूठभर सत्ताधारी मालक व पालकांच्या हातीं त्यांचें जीवन व इभ्रत सोंपवून देऊं इच्छित नाहीं. गरीबांना त्यांच्या हक्कांच्या ठेकेदारांचें सुखी कैदी आम्ही बनवूं इच्छित नाहीं. म्हणून आमचें म्हणणें कीं, गरीबांच्या सत्तेमार्फत त्यांची मालकी कायम व्हावी.

'मूठभर लोकांनीं आपल्या हातांत सत्ता ठेवून गरीबांना सुखांत आणि चैनींत ठेवण्याचा ठेका घेतला तर काय बिघडलें ?' जे लोक हा प्रश्न विचारतात ते विसरतात कीं, धनाची जशी नशा असते तशी च सत्तेची हि असते. व ती धनाच्या नशेहून मुळीं च कमी नसते. ज्यांच्या हातांत धन आणि दौलत असते ते जसें उन्मत्त होतात, तसें च ज्यांच्या हातांत अबाधित निरंकुश सत्ता असते ते हि उन्मत्त होतात. शहरांतले धनाढ्य, शेठ, सावकार, जमीनदार आणि भांडवलवाले ज्याप्रमाणें आपल्या घमेंडींत चूर असतात, तसें च मामुली पुलीस शिपाई किंवा छोटे सरकारी अंमलदार हे देखील आपली अक्कल दाखविल्याशिवाय राहत नाहींत. धनाची नशा मनुष्याला अस्मानांत चढवीत असली तर सत्तेची नशा त्याला पागल करून सोडते, त्याचा स्वतःवर च ताबा राहत नाहीं. म्हणून आम्ही लोकराज्यापुढचें पाऊल टाकूं इच्छितों.

## बोका व ब्राह्मण

गरीबांच्या सत्तेचीं लक्षणें आपल्या ध्यानांत आलीं. आतां गरीबांची मालकी म्हणजे काय व तीपासून काय काय गोष्टी निघतात हें पहावयाचें आहे.

बंकीम बाबूंचें 'कमलाकान्ताचें दफ्तर' नांवाचें एक मौजच पुस्तक आहे. त्याचें 'चौबे का चिठ्ठा' असें हिंदींत भाषांतर हि झालेलें आहे. त्यांत एक गोष्ट आहे. एका खेडेगांवांत एक ब्राह्मण महाराज एका गवळणीच्या शेजारी राहत होते. ते भोजन-प्रिय होते. भोजनाचें निमंत्रण घेणें हा त्यांचा धंदा च होता. मधून मधून गवळण त्यांना जेवण्यास बोलवीत असे. एक दिवस श्राद्धाच्या निमित्तानें तिनें त्यांना बोलाविलें. दक्षणा मिळणार होती म्हणून ब्राह्मण महाराजांनीं मोठ्या इमानदारीनें आणि एकाग्रतेनें भोजन केलें, मुळीं च कसर ठेवली नाहीं. भोजन आकंठ झालें. दक्षणा घेऊन विडा चघळीत महाराज जाऊं लागले, तेव्हां गवळण म्हणाली,

"तुमच्या नांवाचा खव्याचा एक गोळा माझ्या घरीं शिल्लक राहिला आहे, तो घेऊन जा, नाहींतर मला पाप लागेल." महाराज गोळा घेऊन घरीं आले व काळजीपूर्वक गोळा शिक्यावर ठेवून दिला आणि खाल्लेलें पचविण्यासाठीं चांगली कडक माजूम बनवून खाल्ली. त्यामुळें थोडीशी नशा आली आणि नशेंत च बसल्या बसल्या स्वारी विचार करूं लागली, 'उद्यां ह्या खव्याचें काय करावयाचें ?' जशा सरकारच्या व निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या पंचवार्षिक, दशवार्षिक, द्विवार्षिक योजना बनतात, तशी ह्या महाराजांची हि एकदिनात्मक योजना बनूं लागली. उद्यां

ह्या खव्याचा लाडू करावयाचा कीं मोदक, यावर विचार सुरू झाला. इतक्यांत कोठून तरी एक बोका आला व खव्याकडे जाऊं लागला. महाराज बोलले,

'अरे तूं मोठा चोर, लुटारू दिसतोस, दिवसा ढवळ्या माझ्या देखत खवा घेऊन जाण्यास आला आहेस.'

नशेची करामत अशी कीं तो बोका हि बोलूं लागला.

तो सद्गद् कंठानें म्हणाला, "महाराज आपण तर उलट्या च गोष्टी करतां. तुमचें पोट आकंठ भरलेलें आहे, त्यांत तिळभर हि जागा नाहीं, तुमचा मात्र त्या खव्यावर हक्क आणि माझ्या पोटांत तीन दिवसांपासून भुकेची आग भडकलेली असून हि माझा त्या खव्यावर अधिकार नाहीं, हा कोठचा न्याय ? हा सरळ न्याय नव्हे, उलटा न्याय आहे."

ब्राह्मण महाराज खवळून म्हणाले "हरामखोरा. तूं मला ज्ञान शिकवितोस, तूं नास्तिक आहेस, तूं बोल्शेविक झाला आहेस, तूं कॅम्युनिस्ट झाला आहेस, न्यायाच्या आणि कायद्याच्या विरुद्ध गोष्टी करतो आहेस."

बोका थोड्या खंबीर आवाजांत बोलला, 'महाराज भुकेलेल्याचा अधिकार अन्नावर नसून, ज्याचें पोट तुडुंब भरलें आहे, त्याचा त्यावर अधिकार आहे असें सांगणारा धर्म, धर्म नव्हे, असें सांगणारी नीति, नीति नव्हे, आणि असें सांगणारा कायदा, कायदा नव्हे.

ह्यावर तर महाराज अधिक च खवळले आणि म्हणाले "बच्याजी, तूं असा वठणीवर येणार नाहींस, थांब, तुझ्यावर

कोर्टांत फिर्याद दाखल करतों. कायद्यानें मला कांहीं मूलभूत हक्क दिले आहेत. त्यांच्या आधारावर मी सर्वोच्च न्यायालयांत जातों."

बोका गंभीरपणें म्हणाला, 'मला मंजूर आहे, तुम्ही खुशाल माझ्या विरुद्ध खटला चालवा पण माझी एक विनंति आहे. दोन शर्ती मंजूर करा. पहिली शर्त ही कीं, फिर्याद दाखल करण्यापूर्वी तुम्हीं सात दिवसांचा उपवास करावा व ह्या सात दिवसांत शेजारच्या गवळणीच्या घरचें दूध तुम्ही चोरून प्यायला नाहींत तर तुमची फिर्याद मला कबूल आहे. माझी दुसरी अट ही कीं, ज्या न्यायाधिशासमोर माझा खटला चालेल, त्यानें हि सात दिवसांचा उपवास करावा व ह्या सात दिवसांत जर त्यानें आपल्या बायकोच्या मेवा-मिठाईच्या कपाटांतून बिस्कीटें चोरून न खाल्लीं तर त्यानें दिलेला निर्णय मला मान्य होईल.'

ह्यावर ब्राह्मण महाराज काय अुत्तर देणार ? त्यांचें तोंड च बंद झालें, शरीर थंड पडलें. ह्या नंतर दोन च गोष्टी होऊं शकत होत्या. एक तर हिंमत असल्यास दंडा मारून बोक्याला हाकलून देता किंवा बोक्यांत दम असता तर तो जबरदस्तीनें खव्याचा गोळा घेऊन जाता. दोन्हीं स्थितींत सोक्ष मोक्ष होऊन जाता, पण प्रश्न मात्र सुटला नसता.

## गरीबांच्या मालकीचीं सूत्रें

आम्ही झगड्याचा कसातरी सोक्षमोक्ष लावूं इच्छित नाहीं, झगडा टाळूं हि इच्छित नाहीं, तर प्रश्न सोडवूं इच्छितों. ज्याला भूक असेल त्याला खवा मिळाला पाहिजे. बोका भुकेला असेल तर त्याला, ब्राह्मण भुकेला असेल तर त्याला. हा खरा न्याय आहे. पण आज मारामारींत जो अधिक ताकदवान असेल त्याला तो

मिळावयाचा. आज ज्यांच्या खिशांत पैसा आहे त्यांना आवश्यक वस्तु मिळतात, ज्यांना जरूर आहे त्यांना नव्हे. रोगी असो वा नसो, विकत घेण्याचें सामर्थ्य असणाराला आज औषध मिळतें व रोगी असून खरीदण्याची ताकद नाहीं म्हणून गरीब औषधा-शिवाय मरतो. आज ज्यांच्या खिशांत पैसा आहे त्याला आवश्यक वस्तु मिळतात, उद्यां ज्यांच्या अंगांत ताकद आहे व हातांत लाठी आहे त्याला मिळतील. आज थैलीवाल्यांची मालकी आहे, उद्यां लाठीवाल्यांची होईल. पण ही क्रांति नव्हे. आम्हांला क्रांति हवी आहे. आम्ही तिच्या द्वारें असा समाज निर्माण करूं इच्छितों कीं ज्यांना आवश्यकता असेल त्यांना गरजेच्या वस्तु मिळाव्या. गरीब माणसाच्या मालकीचें हें प्रथम सूत्र आहे.

गरीब माणसाच्या मालकीचें दुसरें सूत्र असें कीं, उत्पादनाचीं साधनें उत्पादकांच्या हातांत पाहिजेत. अन्न निर्माण करण्याचें साधन जो तें निर्माण करतो त्याच्या हातांत असलें पाहिजे. वस्तु बनविण्याचीं औजारें जो वापरूं शकतो व वापरूं इच्छितो त्याच्या हातांत पाहिजेत, ह्याला म्हणतात सुव्यवस्था. जी स्त्री पोळी बनविते तिच्या स्वाधीन पोळपाट लाटणें पाहिजे. व जी लिहिते वाचते तिच्या हातांत कागद लेखणी पाहिजे. रसोई करणारी बाई जर म्हणूं लागेल कीं मी कागद लेखणी घेईन, व लिहिणारी जर म्हणूं लागेल कीं मी पोळपाट लाटणें घेईन, तर अव्यवस्था होईल आज अशी च कांहींशी स्थिति आहे. जमीन कसणें ज्याला माहीत नाहीं व जो ती कसूं इच्छित नाहीं तो आज जमिनीचा मालक आहे. जे कारखान्यांत मेहनत करूं इच्छित नाहींत ते आज त्यांचे मालक आहेत. ही अंधेर नगरी झाली. कोणाजवळ किती जमीन असावी हा आजचा सवाल नाहीं, तो नंतरचा प्रश्न आहे.

आजचा मूलभूत सवाल हा कीं, ज्याला जमीन कसणें माहीत नाहीं व जो ती कसूं इच्छित नाहीं त्याच्याजवळ वीतभर तरी जमीन कां असावी ? प्रश्न असा आहे कीं, जो जमीन कसतो व कसूं इच्छितो त्याचा ताबा जमिनीवर कां नसावा ?

## आंकडे शास्त्राचा ब्रह्मघोटाळा !

पुष्कळसे लोक आंकडे आणि रकमा ह्यांच्या चक्रांत सांपडतात. ही चळवळ आंकडेशास्त्र्यांची नाहीं. मुनशी, कारकून, हिशेबनीस, क्रांति करीत नाहींत. ते आंकड्यांच्या जाळ्यांत अगदीं गुरफटलेले असतात. जमीन मोजा, माणसें मोजा, त्यांचा गुणाकार करा, माणसांच्या संख्येनें जमिनीला भागा, ह्यांत च त्यांची सर्व अक्कल खर्च होते. एका मोठ्या मुनीमाची गोष्ट प्रसिद्ध आहे. मुनीमगिरींत सर्व आयुष्य गेलेलें. मुलाचें लग्न निघालें, पुढें दोन वर्षें मुहूर्त नव्हता पण पुष्कळ शोध करून हि वीस वर्षांची मुलगी कांहीं मिळेना. मुनीमजींनीं दोन दहा वर्षांच्या मुलींशीं मुलाचें लग्न जमवून टाकलें. गणित केलें, मुली बाजूला पडल्या. दहा आणि दहा=वीस हें गणित शिल्लक राहिलें ! दहा आणि दहा वीस होतात खरें, पण दहा वर्षांची एक व दहा वर्षांची दुसरी अशा दोन मुलीं मिळून वीस वर्षांची एक मुलगी होत नाहीं. अशा प्रकारें हिशेबनीस आंकड्यांत गुंतून राहतात. माणूस बाजूला च राहतो.

## क्रांतीच्या संकेतानें अभिमंत्रित माती

क्रांति अंकगणिताच्या हिशेबानें होत नाहीं, बीजगणितांच्या हिशेबानें होते. आंकड्यांचें वजन व त्यांची किंमत मोजली मापलेली असते. अल्प असते. बीजगणितांत संकेत, चिह्नें,

निशाण्या असतात. त्यांचें मूल्य आणि प्रतिष्ठा अपरिमित असते. त्यांचें वजन व किंमत अमर्यादित असते. गांधीजींनीं एक चिमूटभर मिठाची पुडी करून विकली, हिशेबनीस हिशेब करूं लागले. ह्या गतीनें किती दिवसांत समुद्र शोषेल व किती दिवसांत मिठांच्या वखारी भरतील ! इकडे इंग्रजांचें सिंहासन हालूं लागलें. क्रांतीच्या प्रक्रियेंत संकेतांचें महत्व केंव्हां च विसरतां कामा नये. भूदान-यज्ञाच्या रूपानें जी ही मूठ मूठभर माती एकत्र केली जात आहे, ती क्रांतीच्या अशा संकेतांनीं अभिमंत्रित आहे.

अनुत्पादकांची मालकी आम्हांला नको, उत्पादकांची मालकी आम्हांला कायम करावयाची आहे. उत्पादकांच्या मालकीचें मूलभूत सूत्र हें कीं, उत्पादनाचीं साधनें उत्पादकांच्या स्वाधीन हवीं.

## जमिनीपासून आरंभ कां ?

आम्ही जमिनीपासून ह्याला आरंभ करतों. ह्याची कारणें हि स्पष्ट च आहेत. सर्वांत पहिलें कारण हें कीं, भुकेचा प्रश्न हा सर्वांत महत्वाचा प्रश्न आहे. भुकेचें उत्तर अन्न आहे व अन्न उत्पन्न करण्याचें साधन जमीन आहे. म्हणून जो कसेल त्याच्या हातांत जमीन पाहिजे. जो कसत नसेल त्याला वीतभर हि जमीन ठेवण्याचा अधिकार नसला पाहिजे. दुसरें कारण हें कीं, आमच्या देशांतले, शेंकडा ७८% लोक जमिनीवर अवलंबून आहेत. म्हणून ह्या देशांत जमीन कसणारा किसान ही च क्रांतीची विभूति राहणार. तिसरें कारण हें कीं, उत्पादनाच्या सर्व साधनांचें मूलभूत साधन, अखंड भांडार ही वसुमति, धरित्रि आहे. कोळसा, लोखंड, लांकूड आदि सर्व उत्पादनाची सामुग्री जमिनींतून निघते. म्हणून उत्पादनाच्या मालकीचा आरंभ आम्ही जमिनीपासून करतों.

उत्पादकांची मालकी होईल त्यावेळीं कोणी अनुत्पादक म्हणून राहणार नाहीं. किसानांना जमिनी दिल्यास उत्पादन घटेल असा कांहींचा आक्षेप आहे. किसान आळशी होतील. जे लोक असा आक्षेप घेतात त्यांच्यासमोर समाजाचें पूर्ण चित्र नाहीं.

## राण्या त्या च मोलकरणी

एका कुटुंबांत पांच स्त्रिया होत्या. एका दिवशीं त्यांनीं घटनापरिषद भरवून असा ठराव मंजूर केला कीं, आजपासून आम्ही पांच हि राण्या झालों. बजेट हि पास करून घेतलें. जरीदार रेशमी दोरांनीं टांगलेलें पांच झोंपाळे तयार करण्यांत आले व प्रत्येक राणी नटून सजून मोठ्या ऐटीनें एक एका झोपाळ्यावर बसली. प्रथम च प्रश्न उत्पन्न झाला कीं. झोका कोणी द्यावयाचा? कारण सर्व च राण्या होत्या. झोका देणें त्यांच्या इभ्रतीच्या विरुद्ध होतें. पण त्या पांच हि मोठ्या व्यवहारकुशल होत्या. एखाद्या प्रश्नाबाबत अक्कल चालत नसेल तर सरकार आणि सत्ताधारी पार्टीचें धोरण तो प्रश्न सोडून च द्यावा असें असतें, अशा वेळीं विरोधी पक्ष हि मोठ्या खुबीनें असें म्हणत असतो कीं, जागतिक परिस्थिति बदलेल तेव्हां हा प्रश्न सुटेल! तात्पर्य कसलेल्या राज-नीतिज्ञांप्रमाणें राण्यांनीं ठरविलें कीं, हा प्रश्न सोडून द्यावा. वारा वाहूं लागला म्हणजे झोंपाळे आपोआप च हालतील. पहिला सवाल अशा प्रकारें सुटला. पण दुपारचे बारा वाजले, भूक लागली, तहान लागली. हा प्रश्न कांहीं सोडून देणें शक्य नव्हतें तेव्हां त्यांची डोकीं ठिकाणावर आलीं. मग दुसरा असा ठराव पास करण्यांत आला कीं, सर्वांनीं सर्वांना पाणी पाजावें, जेवण घालावें, झोंके द्यावे. परिणाम असा झाला कीं त्या घरांत ज्या राण्या होत्या त्या मोलकरणी झाल्या व ज्या मोलकरणी होत्या त्या राण्या झाल्या. जितक्या राण्या

होत्या त्या सर्व मोलकरणी आणि जेवढ्या मोलकरणी त्या सर्व च राण्या. याप्रमाणें सर्व च राण्या व सर्व च मोलकरणी अशी स्थिति झाली ह्याला च म्हणतात वर्गहीन समाज.

जे मेहनत करतील ते मालक बनतील. जे मालक बनतील ते मेहनत करतील. सर्व च मालक व सर्व च मजूर. म्हणजे मालक उत्पादक होतील व उत्पादक च मालक होतील. सारांश वर्गहीन समाज म्हणजे उत्पादकांचा समाज.

उत्पादक हा च मालक ह्या विषयींचीं तीन सूत्रें आपणांस मिळालीं. पहिलें हें कीं आवश्यक वस्तु गरजूंना मिळाल्या पाहिजेत. म्हणजे च उत्पादन गरजेसाठीं पाहिजे, नफ्यासाठीं नको. दुसरें उत्पादनाचीं साधनें उत्पादकांच्या स्वाधीन पाहिजेत. आणि तिसरें हें कीं, समाजांत कोणी हि व्यक्ति अनुत्पादक नसावी. ह्याचा च अर्थ मालक आणि मजूर असा भेद होण्याची शक्यता च असूं नये.

## दुःखनिवारणाची नव्हे, क्रांतीची चळवळ

आमची चळवळ कष्टनिवारण किंवा दुःखनिवारणाची नाहीं. भुकेल्याला अन्न, नग्नाला कपडा व भटक्याला घर किंवा आश्रय देण्याचा च तेवढा आमचा उद्देश नाहीं. आम्ही गरीबांना दीन बनवूं इच्छित नाहीं. त्यांना लागणाऱ्या वस्तू पुरवून भिक्षेकरी बनवूं इच्छित नाहीं. उत्पादनाचीं साधनें त्यांच्या स्वाधीन करून त्यांना मालक बनवूं अिच्छितों. जमीन ही कांहीं उपयोगाची वस्तु नव्हे, ती उत्पादनाचें साधन आहे. म्हणून ती उत्पादकांच्या हातीं च राहील.

ह्यावरून आपल्या लक्षांत ही गोष्ट येऊन गेली असेल कीं भू-दान-यज्ञ चळवळ ही जमिनीच्या वाटपाची चळवळ आहे,

उत्पादनांच्या साधनांच्या वितरणाची चळवळ आहे. ती परंपरागत चालू असलेल्या दानधर्माची चळवळ नव्हे, ती आर्थिक क्रांतीचा पाया घालणारी चळवळ आहे.

ह्यानंतर सवाल उठतो कीं, ह्या उद्देशाच्या सिद्धीसाठीं कोणते उपाय योजावेत, क्रांतीची प्रक्रिया कशी असावी, तिचा मार्ग कसा असावा, असा हा प्रश्न आहे. आतांपर्यंत दुनियेसमोर तीन मार्ग आले आहेत. दोन परंपरागत व जुने आणि तिसरा नवा अर्थात् क्रांतीच्या साधनांत च क्रांति करणारा.

## शिकंदराचा मार्ग–अशास्त्रीय व अनुपयुक्त !

पहिला मार्ग सशस्त्र क्रांतीचा म्हणविला जातो. जोर-जबरदस्ती गुद्दागुद्दीचा हा रस्ता आहे. एकदां एका रुमालाला अशी गांठ बसून गेली कीं ती कांहीं केल्या सुटेना. शाहण्यांनीं मसलत करून ठरविलें कीं, शिकंदराला बोलवावें, त्यानें सर्व दुनिया जिंकली तेव्हां तो कांहींना काहीं हिकमत जरूर शोधून काढील. शिकंदर आला. त्याला तलवारी खेरीज दुसरें कांहीं माहित च नव्हतें. त्यानें तलवार घेऊन झटकन गांठ तोडून टाकली. रुमालवाला रडूं लागला व म्हणूं लागला 'रुमाल शाबूद राहील अशा प्रकारें आम्ही गांठ सोडवूं इच्छित होतों. ह्या तिस्मारखानानें येऊन ती सोडविण्याऐवजीं रुमाल च कापून टाकला.'

तुम्हांला आश्चर्य वाटेल कीं मोठमोठे शहाणे व बुद्धिवान लोक ह्याला क्रान्तीचा मार्ग म्हणतात. ह्यांना म्हटलें कीं आम्ही मनुष्याचा मेंदू (विचार) बदलूं अिच्छितों तर ते म्हणतात, त्यांची डोकीं च कापून काढा, म्हणजे मेंदू च शिल्लक राहणार नाहीं व सर्व च त्रास चुकेल. गरीब व अमीर ह्या दोघांना हि जगविण्यासाठीं

आम्ही गरीबी व अमीरी नष्ट करूं अिच्छितों. गांठ कापून काढण्याचा हा प्रकार माणुसकीच्या मुळावर च घाव घालणारा आहे. तो वांकडा व अुलटा रस्ता आहे. आम्हांला काश्मीरला जावयाचें असेल तर तो आम्हांला कन्याकुमारीला नेणारा आहे. तो आमच्या कामाचा नाहीं. तो शास्त्रीय हि नाहीं व समंजस हि नाहीं.

## निर्जीव हातांचा ढीग

दुसरा मार्ग सरकारचा व कायद्याचा. परंतु लोकशाहींत जोंपर्यंत जड संख्येचें महत्व आहे तोंपर्यंत कायद्याच्या मार्फत क्रान्ति शक्य नाहीं. एकदां एका शिपायानें दोन हजार कापलेल्या हातांचा ढीग सेनापतीसमोर केला. सेनापति खुष होऊन म्हणाला, "तूं खरोखर शूर शिपाई आहेस. शत्रूंचे दोन हजार हात तूं कापून आणलेस पण ह्या पेक्षां जर त्यांची हजार शिरें कापून आणलीं असतींस तर किती चांगलें झालें असतें ? शत्रूकडील कोण कोण माणसें मारलीं गेलीं, हें तरी कळलें असतें."

शिपाई मोठ्या विनयानें म्हणाला, 'सरकार, मी शिरें च कापून आणणार होतों, पण नाइलाज झाला. शिरें कोणीं आधीं च कापून नेलीं होतीं, म्हणून हात कापून आणले !'

ह्याला म्हणतात पार्लमेंटरी पद्धति. ह्यांत सर्व ताकद व सर्व अक्कल हात एकत्र करण्यांत व त्यांचा ढीग करण्यांत खर्च होते. एक म्हणतो, माझ्या ढिगांत शंभर हात आहेत. दुसरा म्हणतो माझ्या ढिगांत पाऊणशें आहेत. शंभर हातवाला जिंकला, पाऊणशेंवाला हरला. असा हा केवळ हातांचा हिशेब आहे. ह्यांत बुद्धि किंवा हृदय ह्यांचा कांहीं संबंध आहे असें कोणाला च वाटत नाहीं. ह्याला म्हणतात संख्येची लोकशाही. ह्याचें च नांव आकारात्मक

(quantitative) लोकशाही. आम्ही म्हणतों कीं आमची मोटार वीस हॉर्स पॉवरची आहे. तेव्हां आमच्या डोळ्यासमोर घोडा नांवाचा प्राणी नसतो. हॉर्स पॉवरमध्यें घोडा हा शक्तीचा केवळ एक एकम् आहे, शक्तीचें केवळ एक माप आहे. पावर पालिटिक्स-मध्यें मनुष्य केवळ मनुष्य शक्तीचा एक एकम् किंवा माप बनून गेलेला आहे. संख्या आणि आकार ह्यावर अधिष्ठित लोकशाहींत मानवी गुणांचें स्थान गौण असतें. म्हणून संख्यात्मक व आकारात्मक लोकशाही क्रांतीचें साधन बनूं शकत नाहीं. ती औपचारिक, निर्जीव व निःसत्त्व असते. क्रांतीची ताकद पैदा करण्यासाठीं गुणात्मक (qualitative) लोकशाही स्थापन केली पाहिजे, तिची प्राणप्रतिष्ठा केली पाहिजे. तेव्हां कोठें लोकशाहींत ज़िवंतपणा व वास्तविकता येईल. गुणात्मक लोकशाही स्थापन करावयाची तर लोकजीवनांत मानवी मूल्यांचें बीजारोपण केलें पाहिजे व तें कायदा करून होऊं शकत नाहीं.

## कायद्याची मर्यादा

कायद्याच्या विरुद्ध गोष्टीपासून कायदा आम्हांला परावृत्त करतो, पण कायद्यांत येत नाहीं अशा अनाचारापासून तो आम्हांला रोकीत नाहीं. ४२० कलमांत येणारी लबाडी मीं केली तर न्यायाधीश मला शिक्षा देऊं शकेल, पण मी असा च लोकांना भूल-थापा देत राहिलों तर तो मला दंड करू शकत नाहीं. कायद्यांत विधायक शक्ति नसते. तो फार तर वाईटापासून परावृत्त करील पण चांगलेपणाची प्रेरणा देऊं शकत नाहीं.

एक गोष्ट आणखी आहे. कायदा मनुष्याला हक्क देतो. पण त्याचा उपयोग करण्याची शक्ति देत नाहीं. कायदा फार तर मनुष्याला संधि देतों असें म्हणतां येईल. पण त्या संधीचा फायदा

घेण्याची ताकद तो निर्माण करीत नाहीं. कायदा घोड्याला पाण्यावर नेऊं शकतो, पण पाणी पिण्यास भाग पाडूं शकत नाहीं !

कांहीं उदाहरणें घ्या. आमच्या घटनेप्रमाणें विजयालक्ष्मी, राजकुमारी, सुचेता कृपलानी ह्यांना जितके हक्क आहेत तितके च देशांतील प्रत्येक स्त्रीला आहेत, पण प्रत्यक्षांत आम्हांला काय दिसतें ? ह्या देशांतल्या गृहदेवता घराच्या आवाराच्या बाहेर पडूं शकत नाहींत आणि निघाल्या च तर रस्त्यांत तोंडावरून पदर किंवा बुरखा घेतल्या खेरीज राहत नाहींत. कायद्यानें हक्क दिला, पण शक्ति दिली नाहीं. ही च स्थिति अस्पृश्यांची हि आहे. कागदावर अस्पृश्यता गेली पण जीवनांत ती कायम च आहे. कायद्यानें दारूबंदी झाली पण व्यवहारांत दारू पिणें चालूं च आहे. तात्पर्य, लोकशाहीच्या मार्फत क्रान्ति करावयाची तर कायदा लागेल च. पण त्या कायद्यासाठीं एक सामाजिक वातावरण व अधिष्ठान ह्यांची आवश्यकता असते.

## दुनियेंतील सर्व लोकशाहीसमोरचा यक्षप्रश्न

कायदा आपल्या पायावर उभा राहूं शकत नाहीं. ज्या द्रोणांत आपण डाळ किंवा खीर ह्यासारखे पातळ पदार्थ खातों, त्या द्रोणाला कायद्याची उपमा देतां येईल. द्रोणाला उभा ठेवण्यास दुसऱ्या एखाद्या वस्तूचा आधार लागतो, नाहींतर तो लवंडून जातो. भांडवलशाहींत त्याला थैलीचा आधार असतो, व जोर जबरदस्तीच्या प्रक्रियेंत तो लाठीचा आधार घेतो. प्राचीन ग्रीक व रोमन लोकराज्यांत ह्याचा फार कटु अनुभव आला. कधीं लोकांचीं मतें खरीदलीं जात, तर कधीं धमकीच्या बळावर दडपलीं जात. आज आम्हांला प्रत्यक्ष दिसत आहे कीं, लोकांची बुद्धि किंवा

त्यांच्या आकांक्षा ह्यांना अनुसरून त्यांचें मत नसतें. तर मतें केव्हां लोभानें, तर केव्हां भयानें दिलीं जातात. ज्या लोकशाहीचा आरंभ मताच्या चोरबाजारांतून अथवा लुटींतून होतो तिचा प्रवाह च दूषित होऊन जातो. आज सर्व लोकशाहीसमोर हा च मोठा यक्षप्रश्न आहे.

कसें हि करून निवडणूक जिंकली पाहिजे असें वारें एकदां उमेदवारांच्या डोक्यांत शिरलें कीं मतें गोळा करण्याचें भूत त्यांना पछाडतें. जो मतें मागण्यास जातो तो मतांचा याचक होतो. व जो मतांची भीक मागतो तो लोकमत तयार करूं शकत नाहीं किंवा त्यांत परिवर्तन करूं शकत नाहीं. ज्या लोकशाहींत मतांचा संग्रह कॅनव्हासिंगवर च अवलंबून आहे ती लोकांच्या मनाचें परिवर्तन (Conversion) करूं शकत नाहीं. म्हणून कायद्याचा मार्ग अनुकूल असला तरी अपुरा आहे.

कायद्याच्या मार्गांत आणखी हि एक दोष आहे. त्यामुळें कायदेबाजी बोकाळते. एकदां दोन वकील शेजारीशेजारीं राहत होते. त्यांच्या घरांमिळून मध्यें एक च भिंत होती. एकदां ती भिंत पडली. पण ती ज्या वकिलाची भिंत होती त्याच्या घरांत न पडतां शेजारच्या वकिलाच्या घरांत पडली. भिंतीचा मालक वकील, असें अिच्छित होता कीं बिनखर्चानें तिचा मालमसाला आपल्या घरांत येऊन पडावा. म्हणून तीन दिवसांनंतर त्यानें शेजारच्या वकिलाला नोटीस दिली कीं आमची भिंत तुमच्या आवारांत पडली आहे, ती तीन दिवसांच्या आंत परत करा नाहींतर चोरीचा खटला तुमच्यावर चालवूं. दुसरा वकील कमी डोक्याचा नव्हता. त्यानें उलट नोटीस दिली कीं, तुमचा माल आमच्या घरांत पडला आहे. त्याचें भाडें द्या नाहींतर तुमच्यावर फिर्याद चालवावी लागेल.

## कायदेशीर अपक्रांति

कायदा बनवा असें सर्व च म्हणतात. पण तो बनला कीं सुप्रीम कोर्टांत तो रद्द करविण्यासाठीं जातात. वर्षानुवर्ष मामला चालू च राहतो. कधीं कायदा स्थगित केला जातो, कधीं अनधिकृत ठरविला जातो. सर्वोच्च न्यायालयानें हि जर तो वैध किंवा अधिकृत ठरविला तर विधानसभेच्या लोकांचीं मतें एकत्र करून त्यांत संशोधन किंवा दुरुस्ती करून घेण्याचा प्रयत्न होतो व ह्या प्रयासांत पुष्कळ कालापहरण होतें. कायदा बनवा असें जे लोक म्हणतात, त्यांच्या मनांत आजचें मरण उद्यां परवांवर टाळण्याचें असतें. कांहीं लोकांच्या मनांत अशी हि भावना असते कीं, कायद्याच्या क्षेत्रांत आम्हांला आमची हातचलाखी चालविण्याची संधि मिळेल. पारिभाषिक शब्दांत ह्याला कायद्याच्या क्षेत्रांतली प्रतिक्रान्ति म्हणतां येईल. ह्या प्रतिक्रान्तीचा सामना करण्यांत च पुष्कळ वेळ बरबाद होतो.

ह्याशिवाय एक मूलभूत अडचण हि आहे. कायदा दोन प्रतिवाद्यांत समेट घडविण्याऐवजीं त्यांच्यांत वैमनस्य उत्पन्न करतो. कायदा ज्याच्या विरुद्ध जातो त्याचें मन खट्टू होतें. तो दबून जातो किंवा चिडून जातो. कायदा ज्याला अनुकूल होतो त्याला सर्व ठेंगणें होतें व तो उन्मत्त अथवा उच्छृंखल बनतो. मालगुजारी आणि जमीनदारी रद्द करणाऱ्या कायद्याच्या बाबतींत आमचा असा च अनुभव आहे. गरीबी आणि अमीरी दोन्ही हि नष्ट करण्यांतला आमचा उद्देश मनुष्यामनुष्यांतलें अंतर कमी करण्याचा आहे. पण कायद्यानें हा उद्देश सफल होत नाहीं. म्हणून भू-दान-यज्ञाच्या प्रक्रियेचा आधार, मनुष्याचें मत-परिवर्तन व वृत्ति-परिवर्तन करणें हा आहे, केवळ वस्तुपरिवर्तन नव्हे.

## वर्ग-समन्वय नव्हे, वर्ग-निराकरण

आम्ही वर्ग-निराकरण अिच्छितों,वर्ग-समन्वय नव्हे. वर्ग-समन्वय हा एक अपसिद्धांत आहे. अंधार आणि उजेड ह्यांत समन्वय कसा होऊं शकेल ? अमीरी आणि गरीबी ह्यांचा मेळ कसा बसूं शकेल ? गरीबी राहिली तर च अमीरी टिकणार. अमीरांची अमीरी जितकी वाढेल तितकी च गरीबांची गरीबी वाढत जाणार. म्हणून वर्ग-समन्वय अशक्य वस्तु आहे. पण वर्ग-निराकरणांबरोबर च उभय वर्गांतील व्यक्तींचा समन्वय आम्हीं जरूर अिच्छितों. अमीरी आणि गरीबी नष्ट करण्यासाठीं अमीर आणि गरीब दोघांचें सहकार्य आम्हांला पाहिजे. ह्यानें वर्ग-निराकरण होऊन, मानवतेचा विकास होईल. भू-दान-यज्ञ ही क्रांतीची अशी एक प्रक्रिया आहे कीं, तिच्या-मुळें वर्ग-कलहाशिवाय वर्ग-निराकरण होतें व प्रतिक्रांतीस अवकाश राहत नाहीं. सशस्त्र किंवा कायद्याच्या द्वारें होणाऱ्या क्रांतींत हें वैशिष्टच नाहीं. त्यांतून प्रतिक्रांति अवश्य निघावयाची. ज्या राष्ट्रांत सशस्त्र क्रांति झाली त्यांच्या अनुभवापासून आम्ही कांहीं च शिकणार नाहीं काय ?

ही ऐतिहासिक व सांस्कृतिक भूमिका नजरेसमोर ठेऊन संत विनोबांनीं आर्थिक क्रांतीच्या एका अपूर्व आणि अमोघ प्रक्रियेचा आविष्कार केला आहे. ही च प्रक्रिया भूदान-यज्ञाच्या नांवानें ओळखली जाते. शब्द जुने आहेत, पण त्याचा अर्थ क्रान्तिकारी भावना आणि संभावनांनीं परिपूर्ण आहे.

## भू : धरित्री, वसुंधरा, माता

पुष्कळ लोकांना वाटतें भू शब्दाचा अर्थ सर्वांना परिचित च आहे. पण खरोखर अशी स्थिति नाहीं. भू शब्दाचा अर्थ जमीन

च असा नाहीं. भू म्हणजे केवळ मातीचा गोळा नव्हे. भू शब्दांत मनुष्याच्या अनंत सांस्कृतिक,आर्थिक आणि राजनैतिक भावना भरलेल्या आहेत. हा 'भू-गोल' मनुष्याचें निवासस्थान आहे. मनुष्येतर प्राणी आणि सृष्टि ह्यांच्या बरोबर सहजीवनाच्या प्रयोगाची ती प्रयोगभूमि आहे. आपल्या आणि दुसऱ्यांच्या जीवननिर्वाहाची सामग्री गोळा करण्याचें मूलभूत साधन आहे. ही पृथ्वी, आमची धरित्री, वसुंधरा आणि माता आहे. प्रभुत्ववादी मनुष्यांनीं तिला आपली भोगदासी करूं इच्छिलें. त्यांना नर-पति व भू-पति होण्यांत धन्यता वाटूं लागली. ईश्वराच्या कृपेनें व विधात्याच्या इच्छेनें भारतवर्षाच्या ह्या पुण्यभूमींत आज कोणी नरपति राहिला नाहीं. ह्याच्या पुढचें पाऊल हें कीं, कोणी भू-पति हि राहणार नाहीं. आजपर्यंत जो राजा असे तो च लोकांचा स्वामी आणि जमीन व दौलतीचा मालक असे. आज आमचें सिंहासन भारतवर्षाच्या लोकाध्यक्ष चक्रवर्ति दरिद्रिनारायणाचें आहे. म्हणून ह्या देशाचें धन किंवा धरित्री आज कोण्या हि व्यक्तीची राहिलेली नाहीं. त्याच्यावर चक्रवर्ति दरिद्रनारायणाचा अधिकार राहील.

पुराणांत आम्हीं वाचतों कीं जेव्हां धरणीमाता अतिशय संतप्त व संत्रस्त होते तेव्हां ती गायीचें रूप घेऊन भगवंताच्या चरणीं शरण जाते व आपली तक्रार त्यांना सांगते. आज धरित्रीमाता अखिल विश्वाच्या पालनकर्त्या भगवंताच्या पायांशीं जाऊन आपली तक्रार त्यांच्या कानावर घालीत आहे.

भगवान् विचारतात,

"तुला कोण पीडा देत आहे ?"

धरित्री कण्हत कण्हत सांगते कीं, "हे प्रभो ! ह्या मालकांनीं मला जेरीस आणलें आहे."

भगवान् आश्चर्यचकित होऊन विचारतात, "मालक? मृत्यु लोकांत तर सर्व तुझीं मुलें च आहेत, हे मालक कोठचे आले?"

पृथ्वी लज्जित होऊन म्हणते, "काय सांगूं भगवन्, हे माझे पुत्र म्हणवितात पण पति बनूं इच्छित आहेत. 'बेटे' म्हणवितात पण 'मालक' बनण्याचा धाक घालतात, असे हे अधम आहेत."

## न कोणी राजा, न मालक असें देव बोलून चुकला आहे !

धरणीमातेच्या अंतःस्थळांतून निघणारी ही खोल वेदना, तिच्या मातीच्या कणाकणांतून निघणारा हा आर्त स्वर भगवंतांच्या हृदयांत गुंजूं लागला आहे. ह्या देशाचें सारें आकाश आणि वायु-मंडल भू-मातेच्या ह्या आकांक्षेनें प्रतिध्वनित होत आहे. भगवान् आतां बोलून चुकले आहेत कीं, ह्या देशांत आतां कोणी राजा राहिलेला नाहीं, व तसा च कोणी मालक हि राहणार नाहीं. हें ब्रह्मदेवाचें लिखित आहे. ह्यांत तिळमात्र फरक पडणार नाहीं.

प्रश्न असा उठतो कीं, ब्रह्मदेवाच्या लिखिताप्रमाणें व इति-हासाच्या क्रमाप्रमाणें जर ह्या गोष्टी होणार च आहेत, तर भूदान-यज्ञाचा हा खटाटोप कशाला? ह्याला उत्तर हें कीं, मनुष्याच्या विधायक पुरुषार्थानें जी क्रान्ति घडून येते तिच्यांत च मानवी मूल्यांची प्राणप्रतिष्ठा करण्याचें सामर्थ्य असतें. केवळ प्रतिकारात्मक शक्तींत अभावात्मक पुरुषार्थ असतो, तिच्यांत निषेधात्मक प्रेरणा असते. लोकव्यापी विधायक पुरुषार्थाच्या चळवळीखेरीज जनते-साठीं च आणि जनतेद्वारां जनतेची क्रांति होऊं शकत नाहीं दान आणि यज्ञ ह्यांची प्रक्रिया गरीब आणि अमीर ह्या दोघांना विधा-यक पुरुषार्थ करण्यास अवसर व प्रेरणा देते.

अमीरांकडचें दान परिग्रहाचें प्रायश्चित्त, संपत्तीचें विसर्जन आणि नफ्याच्या प्रेरणेचा निरास एवढ्यासाठीं आहे. परिग्रह म्हणजे संपत्ति एकत्र करणें, ही चोरी आहे, पाप आहे. हें दान संपत्तीच्या संरक्षणासाठीं नाहीं. व्यक्तिगत पुण्य गांठीं पडावें, किंवा सद्‌गति प्राप्त व्हावी, एवढ्यासाठीं हि नाहीं. संपत्तीच्या विसर्जनासाठीं--संग्रहाच्या समर्पणासाठीं आहे. हें दान म्हणजे अेक प्रसंग नसून प्रक्रिया आहे. सतत चालू असणारी क्रिया आहे. विनोबा अमीरांना सांगतात कीं, संपत्तीचा ६ वा हिस्सा मला द्या. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं तेवढा देऊन बाकीच्या ⅚ चा निर्धास्त उपभोग घेत बसा. ते इतकें च सांगतात, आज ६ वा हिस्सा द्या. उद्यां अर्धा द्या, परवां ६ वा तुम्ही राखा व बाकीचा ⅚ मला द्या, व १९५७ पर्यंत जेवढी तुम्ही स्वतः कसूं शकाल तेवढी च जमीन जवळ ठेवा, बाकीची दरिद्रनारायणाच्या चरणीं अर्पण करा. भूदान-यज्ञ वास्तविक भूमीच्या योग्य वाटपासाठीं भूमि देण्याची प्रक्रिया आहे. भूमीचें न्याय्य वितरण व्हावें म्हणून हें दान आहे. ह्यांत देणाराचें पाप-क्षालन होतें व घेणाराचा सन्मान वाढतो. ह्यांत अमीरांचे दोष धुतले जातात व गरीबांचा बहुमान होतो.

## संपत्तीचा अंत व मानवतेचें रक्षण

विनोबा म्हणतात, तुम्ही काळ पुरूषाचीं पदचिह्नें ओळखा. इंग्रजांचें साम्राज्य गेलें, राजांचीं राज्यें गेलीं, आतां अमीरांची अमीरी हि जाणार आहे. नवीन युगाच्या प्रवाहाला व वेगाला आळा घालणें अशक्य आहे. काळ ओळखून इंग्रजांनीं आपलें दिल्लीचें सिंहासन स्वतः होऊन सोडलें. आज आमचा त्यांचा

सभ्यपणाचा संबंध कायम आहे. राजे लोकांनीं स्वखुषीनें आपलीं राज्यें जनताजनार्दनाच्या चरणीं अर्पण केलीं. त्यामुळें आज ते लोकांत निर्धास्तपणें राहूं शकतात. अमीर जर आपल्या संपत्तीचें विसर्जन स्वखुषीनें करतील तर त्यांची संपत्ति च जाईल, पण त्यांची इज्जत आणि हिंमत कायम राहील. आम्ही अमीरांच्या संपत्तीचा अंत करूं इच्छितों, त्यांच्यांतील मानवतेचा नव्हे.

## भांडवलशाही पुरुषार्थाला एकमात्र संधि.

मला दोन थपडा लावून माझें घड्याळ कोणी नेलें तर घड्याळ जातें च, पण माझा स्वाभिमान आणि पुरुषार्थ हि नाहींसे होतात. एकतर मी भिऊन जातों किंवा सुडाच्या भावनेन जळफळतों. सूड घेण्याची संधि सारखी पाहत असतो. रशियाच्या क्रान्तीनंतरच्या ३५ व्या आणि चीनच्या क्रान्तीनंतरच्या ५ व्या वर्षाच्या युगांत सध्यां आम्ही आहोंत, हें सांगण्याची आवश्यकता नसावी. ह्यावेळीं भांडवलशाहींतील सर्व अंतर्गत विरोध शेवटच्या मर्यादेपर्यंत पोंचलेले आहेत. भांडवलशाही त्रिदोष-सन्निपाताच्या अवस्थेंत असून शेवटचे श्वास घेत आहे. सूड किंवा विरोध करण्याची शक्ति आज अमीरांत राहिलेली नाहीं. गरीबांशीं स्नेह-संबंध स्थापित करण्याच्या एकमात्र संधीचा लाभ घेण्यांत आज पुरुषार्थ आहे.

धाकाचा किंवा धमकविण्याचा ह्यांत प्रश्न च नाहीं. आकाश काळ्या ढगांनीं भरून गेलें असतां जो मनुष्य आम्हांस छत्री घेण्यास सांगतों तो आमचा वैरी नसून मित्र आहे. तो आम्हांला आगाऊ सावधान करीत आहे. अमीरांना दानाची संधि देऊन विनोबा त्यांना सावधानाचें छत्र देत आहेत, बागुलबोवा दाखवून भिववीत नाहींत.

## सत्याग्रही प्रक्रियेचें वैशिष्टय.

'दान' शब्दांत कांहीं लोकांना जीर्णमतवादाचा वास येतो. ते म्हणतात, धन काय अमीरांच्या बापांचें आहे कीं, तें आम्हीं त्यांच्याकडून दान मागावें ? त्यांच्याकडून दान मागण्याचा अर्थ च असा होतो कीं, त्यांची मालकी आम्ही अप्रत्यक्ष रीत्या कबूल करतों.

हा विचार भ्रांतिमूलक आहे. कोणी मनुष्य माझी टोपी हिसकावून घेत असेल तर मी त्याला समजावून सांगतों 'पहा टोपी माझी आहे, तुझी नव्हे. ती तुला घेण्याचा कांहीं च हक्क नाहीं. बऱ्या बोलानें परत करशील तर झगडा टळेल.' त्याच्या लक्षांत गोष्ट येते व टोपी परत करण्यासाठीं तो हात पुढें करतो. त्यावेळीं मी त्याला काय असें म्हणूं कीं, 'थांब, तुला दोन थपडा लावूं दे व माझी टोपी मला हिसकावून घेऊं दे.' अमीर जर काळ-वेळ पाहून आपल्या संपत्तीचें दान करावयास तयार झाला तर तेवढयानें च त्याचा तिच्यावरचा मालकी हक्क सिद्ध होत नाहीं. क्रान्तीच्या प्रक्रियेबाबत जे लोक जीर्णवादी कट्टर, कर्मठ नसतील त्यांच्या डोक्यांत असा आक्षेप कधीं च येणार नाहीं. हें दान वास्तविक वस्तु परत करण्याची क्रिया आहे. इंग्रजांना हि आम्हीं असें च म्हटलें होतें कीं, स्वखुषीनें राज्य सोडा. सत्याग्रहाच्या शिस्तीप्रमाणें आम्ही त्यांना पूर्व सूचना देत असूं. गांधीजींनीं त्यांना 'गुडघे टेकून हात जोडून' राज्यत्याग करण्याची विनंति केली होती. सत्याग्रही प्रक्रियेची ही विशेषता आहे. त्याचें च अनुकरण आज विनोबा करीत आहेत. अमीरांना आपली मानवता सिद्ध करण्याची ही संधि आहे.

सत्याग्रही प्रक्रियेंत अमोघ व अदम्य आस्तिकता आहे. सत्याग्रही कोणाला च दुष्ट मानीत नाहीं. अमीर दुष्ट नाहीं. तो दुष्ट असता तर सर्व गरीब अमीर बनण्याची इच्छा न राखते. ते दुष्ट थोडे च होऊं इच्छितात ? अमीर दुष्ट असता तर अन्नदान, वस्त्रदान करण्याची, दवाखाने, पाठशाळाआदीसाठीं धन देण्याची प्रेरणा त्याच्या हृदयांत झाली नसती. त्याच्या हृदयांत हि दया व सहानुभूति आहे. पण अमीरीमुळें त्याची भूमिका कठिण व अडचणीची होते व समाज त्याचा विरोधी होतो. व्यवसायजन्य परिस्थितीमुळें तो दुष्ट वाटतो, व्यक्तिशः तो दुष्ट नसतो. व्यक्तिगत सैतानी त्याच्यांत नसते. त्याच्या भूमिकेमुळें त्याच्या ठिकाणीं सैतानीपणा आलेला असतो. आम्ही त्याचा सैतानीपणा नष्ट करून त्याला माणूस बनवूं इच्छितों. अमीरीचा निरास अमीरांच्या उद्धारार्थ आहे.

## अमीरांची माणुसकी विकसित होत आहे.

माणुसकीची प्रेरणा आणि काळाचा दाब अमीरांत माणुसकी उद्‌बुद्ध करीत आहेत. इंग्रज आणि देशी राजांच्या उदाहरणानंतर ही गोष्ट अशक्य किंवा अव्यवहार्य आहे असें कोणी म्हणूं शकणार नाहीं. बिहारच्या जमीनदारांनीं लाख लाख एकर जमीन विनोबांना दिली. अमीर आपण समयज्ञ आहोंत असें दाखवून राहिले आहेत. ह्या समयज्ञतेंतून त्यांच्या ठिकाणीं मानवता विकास पावेल.

पण भूदानयज्ञाच्या चळवळीचा विशेष हा कीं, तिच्यांत अमीरांपेक्षा हि गरीबांच्या पुरुषार्थाला अधिक वाव आहे. तिजोरी-तलवारीच्या जागीं विळा-हातोड्याची, नांगर-वखराची आणि चरखा-मागाची प्रतिष्ठा आम्हीं कायम करूं इच्छितों. म्हणून

आमच्या क्रान्तीच्या प्रक्रियेंत पुरुषार्थाचें साधन थैली किंवा लाठी, तिजोरी किंवा तलवार नाहीं. अमीर मूठभर असतात, शस्त्रधारी शिपाई हि मूठभर च असतात. उत्पादक, परिश्रम करणारे गरीब करोडों आहेत. ह्या गरीबांत परस्परांविषयीं सहानुभूतीची आणि आत्मीयतेची भावना निर्माण करणें क्रान्तीची पहिली अपरिहार्य अट आहे. ह्याशिवाय गरीबांची संघटना होऊन त्यांची अजेय सेना बनूं शकणार नाहीं.

कांहीं गरीबांजवळ १० एकर जमीन आहे, कांहींजवळ एक अर्धा एकर तर कांहींजवळ कांहीं च नाहीं, ते अगदीं च भूमिहिन आहेत. ह्या सर्वांना एकतेच्या सूत्रांत ओवावयाचें आहे. ह्या एकतेचें, मातृभावाचें चिह्न गरीबांचें भूदान आहे. गरीबांचें भूदान त्यांच्या त्यागाचें प्रतीक आहे, एका गरीबाचें दुसऱ्या गरीबाशीं प्रेम आहे हें दाखविणारी त्यांच्या स्नेहाची, मातृभावाची ती निशाणी आहे. गरीबीचें साधन पैसा किंवा शस्त्र होऊं शकत नाहीं. त्याग आणि बलिदानाचें सामर्थ्य हा च त्यांच्या पुरुषार्थाचा आधार आहे. गरीबांकडून दान घेऊन विनोबा गरीबांची फौज खडी करीत आहेत. शेंकडा ९५ किंवा ९७ लोक गरीब आहेत. ते एक होतील तर त्यांची एकता वज्राहून हि अधिक अमोघ सामर्थ्य दाखवूं शकेल. शेंकडा ५ असलेल्या अमीरांवर त्यांना डोळा हि उचलावा लागणार नाहीं, हातांची तर गोष्ट च सोडा.

## गरीब आपल्या भाग्याचा विधाता कसा बनेल ?

ग़रीबांच्या दानांत एक फार मूलगामी तत्त्व आहे. भांडवल-शाहीचा पाया च मुळीं मालकीची भावना व नफ्याची प्रेरणा हा आहे. संपत्तीच्या मोहाचें हें मूळ आहे. गरीबांना भांडवलशाहीच्या शृंखलेंत जखडणारी ही चांदीची बेडी आहे. आपली सोन्याची

कडीं लुटलीं जातील अशी भीति अमीरांना असते, पण गरीबांना कसला डर आहे ? त्यांच्याजवळ नेण्यासारखें असतें च काय ? पण जर कैदी आपल्या बेड्या कोणी चोरून नेईल म्हणून भीत असेल तर त्याला तुम्ही काय म्हणाल ? विपुल संग्रहाला अमीरी म्हणतात, अल्प संग्रहाला गरीबी म्हणतात. अमीराला मोठ्या मालकीचा मोह आहे, गरीबाला छोट्या मालकीची ममता आहे म्हणून भांडवलशाहीच्या इंद्रजालानें गरीब हि चक्रांत सांपडतो. आम्ही अमीरांना सांगतों, अमीरी सोडा व गरीबांना सांगतों गरीबी सोडा. ज्या दिवशीं गरीब आपल्या छोट्या मालकीची बेडी तोडून टाकील, त्या दिवशीं तो स्वतंत्र होईल व स्वतः च आपल्या भाग्याचा निर्माता बनेल.

अमीर आपल्या संपत्तींतून दान करीत असतो. वीस भाकरीं-तून पंधरा सुद्धां देऊन टाकतो. तरी हि पांच भाकरी त्याच्या पोटासाठीं राहतात च. म्हणून संपत्तीच्या विसर्जनाला आम्ही दान हें नांव दिलेलें आहे. दान शब्दांत नफ्याची प्रेरणा सोडून देण्याचा संकेत आहे. पण जो आपल्या एक भाकरींतून पाव भाकरीचा नैवेद्य दाखवितो, तो भगवंताला आपल्या हृदयाचा तुकडा च जणूं अर्पण करतो. आपलें पोट मारून तो आपली स्नेहभावना प्रकट करतो. म्हणून गरीबांच्या दानांत यज्ञाचे सर्व गुण येतात. म्हणून त्याच्या दानाला आम्ही यज्ञ म्हणतों. त्यांत मालकीच्या भावनांचा च त्याग आहे. आम्ही मालकी विभागून सर्वांना च मालक करूं इच्छितों. पण हें आमचें मध्यंतरीचें काम आहे. तो आमचा मुक्काम नव्हे. ध्येय नव्हे. ती आमची छत्री आहे. छप्पर नव्हे. आमचे अंतिम पाऊल भूमीचें ग्रामीकरण हें आहे. त्यासाठीं उत्पादकाची मालकी हें मधलें मूलभूत निश्चित पाऊल आहे.

## पारस्पारिक उद्धाराचा प्रशस्त मार्ग—भूदान.

कांहीं लोक असें हि म्हणतांना आढळतात कीं भूमिदानांत देणारांची प्रतिष्ठा आहे, पण घेणारांचा गौरव नाहीं. सशस्त्र क्रांतींत काय घेणाराचा गौरव होत असतो ? कायदा केल्यानें घेणारा काय सन्मान पावतो ? सरकारनें कायदा केला, भूमिहीनाला जमीन मिळाली, ह्यांत त्यांचा काय पुरुषार्थ ? शस्त्रधारी, क्रांतिकारी लोकांनीं सर्व जमिनीचा कबजा घेऊन नंतर लोकांना कसण्यासाठीं ती वाटून दिली ह्यांत घेणाराचा कोणता पुरूषार्थ आहे ? हा फार मोठा भ्रम आहे. कायद्यानें सरकार जमीन घेते, शस्त्रधारी क्रांतिकारी पक्ष शस्त्रप्रयोगानें ती घेतो. आज दरिद्र-नारायणाचे प्रतिनिधि-विनोबा ती घेत आहेत, ह्यांत तात्त्विक फरक काय पडतो ? ह्या भ्रमाचें कारण आमच्या बुद्धीवर परंपरागत क्रांतिकारी प्रक्रियेची जबरदस्त पकड आहे, हें आहे. बुद्धिमान माणसें हि आजपर्यंत क्रांतीच्या साधनांबाबत गतानुगतिक च राहिलीं आहेत. ह्या दानांत जर गरीब हि सामील आहेत, तर दाता, दीन, उदार व भिकारी असा फरक राहिला च कोठें ? छोटा किसान व मजूर दोन्ही एका च श्रेणीचीं माणसें आहेत. त्यांची सामाजिक योग्यता एका दर्जाची आहे. जर एक दुसऱ्याला जमीन देत असतील तर तें संप्रदान दोघांचा हि उद्धार करणारें आहे.

समजा, दंग्याधोप्यांत कारागिरांचीं अवजारें हिसकलीं गेलीं. लांकूडतोड्याची कुऱ्हाड त्याच्याजवळ टिकली नाहीं, किसानाची कुदळी गेली आणि लोहाराचा हातोडा कोणी घेऊन गेला. आम्ही ह्या सर्वांना एकत्र आणून त्यांच्यांत दृढसंकल्पाची शक्ति निर्माण करतों. ह्या संकल्पाच्या प्रभावानें त्यांच्या वस्तु त्यांना परत मिळत असतील तर त्यामुळें त्यांचा गौरव वाढत नाहीं का ?

आम्ही इनाम वाटतांना क्रिकेटच्या चांगल्या खिलाडूला उत्तम बिल्ला देतों. शिवाजी महाराजांना प्रसाद म्हणून भवानी तलवार मिळाली. आम्ही देखील बहादुर शिपायाला तलवार बक्षीस देतों. अशाप्रकारें उत्पादनाचें साधन उत्पादकांच्या हातांत देतों. हा काय त्यांचा सन्मान नव्हे ?

अमीरी हा गुन्हा असेल तर गरीबी हा हि गुन्हा च आहे. दारिद्रय हा कांहीं सद्‌गुण नव्हे. गरीबींत कांहीं पुण्य नाहीं. दारिद्रय हा सुद्धां सामाजिक अपराध आहे. जो कंगाल आहे तो धनवान होण्यासाठीं रात्रंदिवस तळमळत असतो. धनवान बनण्यांत यशस्वी झालेल्या गरीबाला अमीर म्हणतात. स्पर्धेत जो मागें पडला तो गरीब म्हणवला जातो. अशाप्रकारचा गरीब हताश व हतबुद्ध होतो. गरीबीच्या कारणानें गरीब माणूस राहत नाहीं, पशु बनतो. आम्ही अमीराचा सैतान व त्याबरोबर गरीबांचा पशुपणा हि नष्ट करूं इच्छितों. दोघांतील माणुसकीचें रक्षण आणि संवर्धन करूं इच्छितों. म्हणून क्रांतीची ही प्रक्रिया अद्‌भुत आणि अपूर्व आहे.

## अमीरी व गरीबी हि वांटून घेऊं !

ज्या लोकांना अशी भीति वाटते कीं, जमीनीच्या वाटपामुळें उत्पादन कमी होईल, ते लोक विसरतात कीं, भांडवलशाहींत मालकीच्या भावनेनें च उत्पादनाची प्रेरणा मिळते. जर सर्व च मालक बनले तर ही प्रेरणा वाढेल कीं कमी होईल ? पण समजा उत्पादन घटेल असें घटकाभर मानलें तरी आम्ही म्हणतों आम्हांला उत्पादनाची चिंता नाहीं, जितकी आर्थिक वैषम्य नाहींशी करावयाची आहे. आम्ही आमच्या गरीबीची आणि

भुकेची वाटणी करूं. अमीरी वांटून दिल्यानें जशी कमी होते तशी च गरीबी हि वांटून घेतल्यानें कमी होईल.

उत्पादन वाढविल्यानें आर्थिक वैषम्य नाहींसें होत नाहीं हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. गरजूंना आवश्यक वस्तु मिळाल्या पाहिजेत, पण उत्पादनयोजनांत गरीबांना आवश्यक वस्तु मिळ-ण्याची योजना नसते. एकीकडे उत्पादनाचा पर्वत तर दुसरीकडे भुकेची खोल खाई. अशी स्थिति असूं शकते.

भूक ही ईश्वराचें वरदान हि आहे व काळ पुरूषाचा अभि-शाप हि आहे. भूक संस्कृति जाणत नाहीं, धर्म ओळखीत नाही, राजकीय तंत्र किंवा पक्ष पाहत नाहीं. महान् उग्र तपस्वी विश्वा-मित्रानें हि, भुकेनें गांजले असतांना धर्म आणि संस्कृति ह्यांना धाब्यावर ठेऊन श्वपच चांडाळाकडची कुत्र्याची शिळी तंगडी चोरून खाल्ली. भुकेनें मनुष्याच्या व्यक्तित्वाचा जसा विध्वंस होतो, तसा कोणत्या हि अस्त्रानें किंवा आयुधानें होत नाहीं.

## सुडाच्या भावनेंतून क्रौर्याचा प्रादुर्भाव

चीन क्रान्तींतला एक प्रसंग आहे. एका सभेंत जमीनदारावर आरोप घेतले जात होते. सारें वातावरण क्षुब्ध झालेलें होतें. इतक्यांत एक भोळी पण कनवाळू कुटूंबवत्सल खेडवळ स्त्री उभी होते व म्हणते :

"मी कोंबडी खाते पण आपल्या हातानें तिला कापूं शकत नाहीं. माझ्यासमोर कोणी कोंबडी कापली तर मला तें पहावत नाहीं, माझें काळीज कापूं लागतें. डोळे भरून येतात. पण आज सूड घेण्याची इतकी नशा मला चढलेली आहे कीं, ह्या जमीन-दाराची मान मुरगळून त्याचें रक्त मी पिऊं शकते."

ह्या स्त्रीच्या जागीं आपण आपली आई, बहीण किंवा मुलीची कल्पना केली तर आपल्या लक्षांत येईल कीं, सुडाच्या भावनेनें मनुष्याच्या व्यक्तित्वाचें कसे तुकडे तुकडे होऊन जातात.

सून रोज ईश्वराची प्रार्थना करते. 'पुढच्या जन्मीं मला सासू बनीव आणि ह्या सासूला माझी सून कर, म्हणजे मी हिला रोज केरसुणीनें झोडपीत जाईन.'

ही प्रतिक्रिया स्वाभाविक आहे व आम्ही तें क्षम्य हि मानतों, पण अखेर ती प्रतिक्रिया च आहे. क्रान्तीला 'प्रक्रियावान् माणूस लागतो' प्रतिक्रियावान् नव्हे. प्रत्येक क्रान्तींत प्रतिक्रिया अपरिहार्य असते असें नाहीं. प्रतिक्रियेच्या भावनेनें जी क्रांति होते, तिच्या पोटांतून प्रतिक्रांति निर्माण होते. ह्या क्रांति-प्रतिक्रान्तीच्या परंपरेला अंत नसतो. आम्ही क्रांतीच्या द्वारें मनुष्याच्या व्यक्तित्वाचें रक्षण व संवर्धन करूं पाहतों. त्याला छिन्न भिन्न होऊं देऊं इच्छित नाहीं.

## सार्वत्रिक क्रान्तीचा पांचजन्य—भूदान यज्ञ

श्रीमंतांना आमची आग्रहाची विनंति आहे कीं, त्यांनीं आजच्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करूं नये. आज गरीबांचें राज्य झालेलें आहे. पण जो राजा आहे तो च भुकेलेला आहे. म्हणजे सत्ता भुकेल्या हातांत असून मालकी मूठभर अमीरांच्या हातांत आहे. अशी मालकी किती दिवस टिकणार ? लोकशाहींत, भुकेलेपणा, आणि व्यक्तिगत मालकी ह्या गोष्टी एकत्र नांदूं शकणार नाहींत. केव्हांना केव्हां सत्ताधारी उत्पादक अनुत्पादकांचीं मालकी नाहींशीं केल्याखेरीज राहणार नाहीं. हें विधिलिखित टळूं शकत नाहीं. गरीबांना हि आमची विनंति आहे. किसान खाण्याचे

दाणे आणि पेरण्याचे दाणे अलग अलग ठेवतो. बीज म्हणून ठेवलेले दाणे अधिक गुणकारी व किंमती असतात. गरीबांचें यज्ञरूप दान आमच्या क्रान्तीला बीजासारखें उपयोगी पडेल. गरीबांच्या पराक्रमानें जी क्रान्ति होईल, ती च खरीखुरी सर्वांची क्रान्ति होईल, व म्हणून च ती सर्वकल्याणकारी हि होईल. भूदान-यज्ञाच्या रूपानें अशा क्रान्तीचा पांचजन्य फुंकला गेला आहे. तो आमच्या पराक्रमाला आव्हान व निमंत्रण देत आहे. एवढ्यासाठीं च विनोबांनीं दान आणि यज्ञ ह्या उभय कल्याणकारी प्रक्रियांचा प्रयोग मोठ्या शौर्यानें सुरू केलेला आहे.

आमची कुटुंबसंस्था मानवीय स्नेहावर अधिष्ठित अशा सहजीवनाची प्रयोगशाळा आहे. कौटुंबिक जीवनांतील मूल्यांचा विनियोग सामाजिक जीवनांत करण्याची साधना विनोबा करीत आहेत. ज्यांच्याजवळ जमीनीचें धन आहे त्यांना ते सांगतात, "तुमच्या कुटुंबांत आज पांच माणसें आहेत. ईश्वराची कृपा झाली आणि सहावा मुलगा आणखी आला तर त्याला संपत्तीचा वांटा तुम्हीं देणार नाहीं काय ? तो तर जन्माबरोबर च हक्क घेऊन येईल. विनोबा म्हणतात, जेव्हां येईल तेव्हां तो येवो, पण ईश्वराच्या कृपेनें ह्या मातींतून च दरिद्रनारायणाच्या प्रतिनिधीच्या नात्यानें तुमच्या पुत्राच्या रूपांत मी तुमच्या घरीं प्रगट झालों आहे, मला माझा हिस्सा देणार नाहीं काय ?" ह्या देशाचा सहृदय स्नेहाळू, ईश्वरपरायण खेडवळ हें ऐकून सद्गद् होतो व आपल्या विपन्ना-वस्थेतींल सुद्धां सहावा हिस्सा त्यांना देऊन टाकतो. अशा प्रकारें आपल्या अनुकरणीय पद्धतीनें विनोबा मानवीय मूल्यांचे बीजा-रोपण करीत चालले आहेत.

## पृथ्वी डोलूं लागली आहे

ह्या संताला न सत्तेचा मोह नी मान्यतेची ममता किंवा लालसा. निर्व्याज आणि निरपेक्ष स्नेह ही च त्याची एकमात्र शक्ति आणि भांडवल आहे. त्यानें संकल्प केला आहे कीं, १९५७ पर्यंत साऱ्या देशांतून पांच कोटी एकर जमीन मिळवीन व एक कोट भूमिहीन कुटुंबांना तिचा मालक बनवीन. भूमीच्या ह्या हस्तान्तरांतून समाजांत युगान्तकारी स्थित्यन्तर होईल. हा एका व्यक्तीचा संकल्प नाहीं. ही ह्या देशाच्या जनतेची आकांक्षा आहे. धरित्री मातेची इच्छा आहे, आजच्या युगाची निकड आहे काळ-पुरूषाच्या भेरीचा हा निनाद आहे, व क्रान्तिदेवीच्या डंक्याचा हा आवाज आहे. जमीन आणि आकाश ह्यांच्यांतील हे संकेत परस्परांत मिळून दशदिशांना निनादित करीत आहेत. आतां शेष नागाचा फणा हलूं लागला आहे. पृथ्वी डोलूं लागली आहे. मातीला पाय फुटले आहेत.

## क्रान्तीचा मुहूर्त फक्त आज च, उद्यां नाहीं

श्रीमंत आणि गरीब सर्वांना च आमची हात जोडून सविनय व साग्रह प्रार्थना आहे कीं, ज्यांच्यापाशीं जें कांहीं थोडें बहुत असेल तें त्यानें आपापल्या योग्यतेनुसार भारतमातेच्या चरणीं अर्पण करावें. ज्यांच्यापाशीं मोहनभोग, पूरी असेल त्यानें मोहन-भोग व पूरी आणावी. ज्यांच्या जवळ फुटाणे, मुरमुरे किंवा पाहे असतील ते त्यानें द्यावे. ज्यांच्याजवळ हें हि नसेल त्यांनीं जंगलांतील बोरें करवंदें घेऊन द्यावीं. पण कोणी चुकू मात्र नये. दानाची घडी आणि क्रान्तीचा मुहूर्त आज च आहे, व ह्यानंतर तो मात्र कधीं च येणार नाहीं.

भारत मातेच्या मंदिरांत हात पसरून सर्व च उभे आहेत. पण नैवेद्य आणण्याची मात्र प्रत्येक टाळाटाळ करीत आहे. विनोबा म्हणतात, नैवेद्य आला नाहीं तर प्रसाद कोठून वाटला जाणार ? जेव्हां श्रीमंत आपल्या संपत्तीचा महाप्रसाद भारतमातेच्या चरणीं अर्पण करील व गरीब हि अल्प संपत्तीचा नैवेद्य तिच्या चरणाशीं आणील तेव्हां भगवान् कृष्णाप्रमाणें त्याचा गोपाळकाला करून भारतमाता तो सर्वांना वाटील. सर्व एकत्र खातील ! एकत्र काम करतील, एकत्र विश्रांति घेतील !!

# जीवनदानींचा जीवन-योग

"माणसांची वाण आहे, माणसांचा शोध करून हि ती मिळत नाहींत," चोंहीकडून ही तक्रार आज ऐकूं येत आहे. सरकार देखील ही च तक्रार करतें, मोठमोठे व्यापारी हें च म्हणतात, रचनात्मक संस्थांचे चालक देखील असें च सांगतात, निरनिराळ्या कामासाठीं नोकर-चाकर ठेवणारे सुखवस्तु लोक सुद्धां हें च म्हणतात आणि आपल्या शेतांतील कामाकरतां एखाद-दुसरा दिवस मजूर ठेवणाऱ्या गरीब लोकांचे हि असें च मत आहे. एका बाजूनें ही ओरड ऐकूं येत आहे कीं लोकसंख्या बेसुमार वाढत आहे, तर असें हि दिसतें कीं, कांहीं श्रीमंत लोक मुलें दत्तक घेत आहेत. आणि निरनिराळ्या संस्थांत मात्र माणसांचें दुर्भिक्ष आहे. याचा अर्थ च हा कीं, योग्य आणि उपयुक्त माणसांचा हल्लीं दुष्काळ पडला आहे. भूदान-यज्ञ-आंदोलनांत देखील ही च उणीव दिसून येत होती. " देणारे आहेत, मागणारांची च कमतरता आहे, लोक

जाणून घेण्याला उत्सुक आहेत, परंतु त्यांना समजावून सांगणारे कोठें आहेत?" विनोबा जयप्रकाशपासून तो सामान्य कार्यकर्त्यांची ही च तक्रार होती. जीवन-दानांतून या तक्रारीचें सर्वांना संतोष देणारें असें उत्तर मिळायला हवें. भारत म्हणजे एक माणसांचा महासागर आहे, त्यांत का माणसांची कमतरता भासणार? क्षार-समुद्रांत तहानेला मनुष्य पाण्यासाठीं तडफडून मरूं शकतो; परंतु अमृत-सागरांतला एक बिंदु देखील माणसाला अमर करूं शकतो. जीवनदानी आपल्या वृत्तीनें आणि कृतीनें क्षार-समुद्राला अमृत-सागराचें रूप देऊं शकतात.

## जीवनदान कशासाठीं

थांबणारी वस्तु क्रांति असूं शकत नाहीं. सूर्योदयानंतर सूर्याची गति थांबली आहे, असें कधीं च घडून येत नाहीं. क्रांतीच्या सूर्याचा एकदां उदय झाला म्हणजे फिरून तो मावळत नाहीं. कधीं कधीं ढगांमुळें तो दृष्टिआड होत असेल, परंतु खरें पाहिलें तर ते ढग सूर्याला नाहीं झांकत तर आमच्या च दृष्टीला घेरून टाकतात. क्रांतीचें पाऊल संकटांशीं सामना देत असतां कधीं कधीं थांबल्याचा भास होत असेल, परंतु कांहीं झालें तरी तें कधीं हि थांबत नाहीं. रशियाची क्रांति इ. स. १९०५ मधें अयशस्वी झाली. परंतु त्यामुळें क्रांतीचे सेनापति लेनिन कधीं च निरुत्साही झाले नाहींत. त्यांनीं मोठ्या दृढनिश्चयानें सांगितलें कीं, "आम्ही सतत च क्रांतीचें प्रतिपादन करीत असतों. मध्यें च अडून बसणारे, रस्त्यांत च थांबणारे आम्ही नव्हे." भूदान-यज्ञाचें प्रमुख याज्ञिक विनोबा, यांचा सुद्धां हा च संकल्प आहे. आणि गतींत व उत्साहांत शिथिलता येऊं नये, यासाठीं जयप्रकाशजींनीं जीवनदानाचें पुण्यावाहन केलें आहे.

येशू आपल्या मित्रांना म्हणाला होता कीं, 'तुम्ही या बहुरत्न-सृष्टींतील मीठ आहांत.' तेव्हां त्याचा अभिप्राय हा होता कीं, तुमच्या निष्ठेनें आणि कार्यकुशलतेनें या मृत्युलोकांतील जीवनांत एक न्यारी च लज्जत प्राप्त होईल. लेनिनचें आपल्या साथीदारांना असें सांगणें होतें कीं, 'आम्हांला असे क्रांतिवादी हवेत, कीं जे क्रांतीसाठीं आपल्या फुरसतीचा वेळ च नाहीं तर सारें जीवन कुर्बान करतील." कुणीतरी शंका विचारली, "आपलें जीवन कुर्बान करणारे किती लोक निघतील ?" लेनिननें सांगितलें, "मला संख्येची गरज नाहीं. थोडे च हवेत, पण उत्तम हवेत; बोटांवर मोजण्याइतकें हि चालतील पण एकनिष्ठ असावेत; आपल्या वचनाला जागणारे आणि क्रांतीसाठीं पागल झालेले." तेव्हां प्रश्न हा नाहीं कीं जीवनदानी किती आहेत आणि ते समाजांतील कोणत्या पातळीचे आहेत ? प्रश्न असा आहे कीं ते दृढनिश्चयी आहेत ना ? त्यांना क्रांतीची उत्कट इच्छा आहे ना ? आणि ऐषआरामाच्या वस्तु आणि इतर प्रलोभनें त्यांना भाररूप जरी नाहीं तरी कमींत कमी फिकीं वाटत आहेत. असे लोक बोटांवर मोजण्याइतके जरी निघाले तरी ते सारा कारभार बदलून टाकतील. असें म्हणतात कीं, श्रद्धेमुळें पहाड सुद्धां हलवतां येतात. जो विश्वास, जी श्रद्धा अचल सृष्टीला हलवूं शकते, तिचा परिणाम माणसांवर कांहीं च का होणार नाहीं ? जीवनदानी लोकांकरता विचार करण्यासारखी महत्वाची गोष्ट ती ही च आहे.

## अतिमानव नव्हे खराखुरा माणूस

ज्याप्रमाणें साऱ्यांना पोट आहे, त्या च प्रमाणें जीवन-दानीला सुद्धां पोट असतें च. साऱ्यांच्या जिभेला जशी रुचि असते, तशी च जीवनदानींच्या जिभेला देखील रुचि, आवड असते. गुदगुल्यामुळें

त्याला हंसूं येतें व चिमटे घेतल्यास अश्रु देखील येतात. जीवनदानी झाल्यानंतर तो असामान्य बनत नाहीं. परंतु त्याच्या वृत्तींत मात्र जमीनअस्मानाइतका फरक जरूर होतो. जो पोटार्थी आहे, तो उदरभरणासाठीं काम करतो. ज्याला वैभवाची लालसा आहे, तो सुखासाठीं, चैनीसाठीं कष्ट करतो. जो भोग-विलासी आहे तो भोगक्षमता कायम राखण्यासाठीं संयम करतो. परंतु जो क्रांतिनिष्ठ आहे तो क्रांतीसाठीं च जगतो. जो लोक-कार्यांत मग्न आहे तो लोक-सेवेसाठीं च पोट भरतो, आणि जो स्वार्थत्यागी आहे तो इतरांना सुखी करण्यासाठीं संयम राखून बलिदान करतो. दोघांत हा बुनियादी भेद आहे.

उपजीविकेला मुख्य समजून तिला अनुसरून जो आपल्या जीवनाला कलाटणी देतो, तो स्वार्थासाठीं समाजाच्या हिताचा बळी देऊं शकतो. तुम्ही त्याला दाम दिलेत तर तो काम करील, नाहींपेक्षां करणार च नाहीं. काम तुमचें आहे, त्याचें थोडें च आहे ? तो तर पैशाचा दास आहे. ज्याला प्राप्तीची इच्छा आहे, त्याला जर कांहीं फायदा दिसेल तर च तो काम करील, नाहीं तर करणार च नाहीं. त्याला फायद्याशीं कर्तव्य आहे, कामाची त्याला मुळीं च पर्वा नाहीं. काम न झालें तर काय हरकत आहे ? परंतु कोणत्या हि परिस्थितींत स्वतःचा फायदा हा झाला च पाहिजे. जीवनदानी माणसाची मनोवृत्ति याच्या अगदीं उलट राहील. तुम्ही त्याला पैसा द्या वा देऊं नका, त्याच्या 'योगक्षेमा' ची चिंता करा वा करूं नका, त्याला तर काम हें केलें च पाहिजे. जोंपर्यंत त्याच्या शरीरांत प्राण आहे, आणि त्याची बुद्धि शाबूत आहे, तोपर्यंत तो क्रांतीच्या प्रगतिबरोबर च राहील. त्याला उदर-निर्वाह ही मुख्य बाब वाटत नाहीं, तर क्रांति प्रमुख

वाटते. परंतु त्यानें आपल्या प्राणाचें दान केलें नसून आयुष्याचें--जीवनाचें दान केलें आहे. त्याला जनतेच्या पायावर आपले प्राण कुर्बान करावयाचे नाहींत तर जनतेसाठीं आपलें जीवन खर्चं करायचें आहे. म्हणून तो आपल्या निर्वाहाची साधन-सामुग्री समाजापासून धन्यवादपूर्वक घेईल. तिला तो समाजाची कृपा व अनुग्रह समजेल. परंतु त्याबरोबर च तो त्या प्रसादाचा स्वतःला हक्कदार हि मानेल. त्याचेजवळ स्वतःची कांहीं इस्टेट संपत्ति असेल तर तो ती सर्व कृष्णार्पण करील, समाजाची अनामत मानील.

तो विनोबांना असें म्हणणार नाहीं कीं, मी आपल्या इस्टेटीमधून अमुक भाग संपत्ति-दानांत देतों. परंतु हें मात्र सांगेल कीं आतां ही सारी संपत्ति आपली च आहे. मी 'इदं न मम' (हें माझें नाहीं) असें म्हणून या संपत्तीवर संकल्पाचें पाणी सोडलें आहे. जर त्याचे भाऊबंद व बायको-मुलें यांचा अधिकार संपत्तीवर असेल तर तो आपल्या व्यक्तिगत अधिकाराचें विसर्जन करील आणि अपरिग्रही होऊन स्वतःला क्रांतीच्या कार्यांत पूर्णपणें एकरूप करील. जो जीवनदान देतो तो 'विश्व-जित्-यज्ञ' करतो, अर्थात् तो सर्व दानांचा संकल्प एका च दानांत करून टाकतो. जीवनदानांत संपत्ति-दान, श्रम-दान, समय-दान, बुद्धि-दान, साधन-दान आणि आयुष्य-दान सारें कांहीं समाविष्ट आहेत. जीवन-दानांत उपजीविकेचें दान तर समाविष्ट आहे च. ज्याप्रमाणें शंकराच्या बरोबर पार्वती सुद्धां येते, त्याप्रमाणें च जीवनाबरोबर उपजीविका देखील येऊन जाते. प्रभु रामचंद्र जेव्हां राज्यश्री सोडून वनवासाच्या मार्गावर पदार्पण करतात तेव्हां सीतामाई सांवलीप्रमाणें त्यांच्या मागोमाग जाते. जीवनाची जी गति ती च गति उपजीविकेची हि असणार !

## क्रांतीची मृत्तिका

असें म्हणतात कीं, क्रांति-पुरुष मातींतून सैनिक निर्माण करतो. विनोबांनीं मूठ मूठ माती मागण्यापासून प्रारंभ केला. ज्या मातीपासून विटा बनतात, त्या मातीपासून कालीमातेची अथवा गणपतीची मूर्ति बनत नाहीं. मूर्तिसाठीं विशिष्ट प्रकारची माती शोधावी व 'कमवावी' लागते. भूमिदानांत जी माती दात्याच्या स्वयंप्रेरणेनें मिळाली ती च अहिंसक क्रांति-वीर निर्माण करूं शकेल. आतांपर्यंत विनोबांनीं माती कमावली. आतां ते त्या मातींत मानवतेचें बीं पेरूं इच्छितात. म्हणून माती मागतां मागतां संपत्ति मागूं लागले, श्रम मागूं लागले, बुद्धि मागूं लागले, वेळ मागूं लागले, आणि आतां तर आयुष्य देखील मागत आहेत. जो जीवनदान करील, तो समाजाला जीवन-संपन्न करूं शकेल.

## पोटाकरतां काम नाहीं, क्रांतीसाठीं प्रसाद

जो मनुष्य वेतन आणि पैसा यांच्या लोभामुळें या कामांत सामील होईल, तो स्वतःच्या जीवनाला आंचवून बसेल, समाजाला धोका देईल. जो क्रान्तीसाठीं जिवंत राहण्याचा संकल्प करील आणि निर्वाहासाठीं 'प्रसाद' ग्रहण करील, त्याचें जीवित धन्य होईल आणि तो समाजाच्या दृष्टीनें इमानदार राहून स्वतःचें इमान सांभाळील.

---

(३)

## गरीबांच्या क्रांतीचा अर्थ

एका रिक्षेंत पांच माणसें बसून जात होतीं. पोलिसाचें त्याकडे लक्ष होतें. परंतु कांहीं बोलण्याची हिंमत होत नव्हती.

रिक्षेंत मोठमोठे 'बाबू' लोक बसलेले होते, स्वाऱ्या सूट-बूटादि आधुनिक पोषाखांत नटलेल्या होत्या. सर्व लोक स्टेशनवर उतरले, आपापसांत बोलूं लागले. हल्लीं चर्चेचे विषय ठरलेले असतात. एका च चाकोरींतल्या गप्पा सर्वत्र ऐकायला मिळतात.

एक जण म्हणाला, "अगदीं रद्दड सरकार आहे ! कुठें च शिस्त नाहीं. वेळेवर काम होत नाहीं, आणि गरीबांकडे तर थोडें देखील लक्ष नाहीं. प्रत्येक ठिकाणीं त्यांना फसविण्यांत येतें आणि त्यांचा स्वाभिमान पायदळीं तुडविला जातो. राज्यकारभार इतका ईश्वरविरोधी आहे कीं गरीबांचा कैवार प्रत्यक्ष ईश्वर देखील घेऊं शकत नाहीं." इत्यादि इत्यादि.

दुसरा म्हणतो, "भांडवलशाहीचा अंमल आहे. किसान-मजूर यांच्या संघटनाशिवाय काम होणार नाहीं. मी तर हल्लीं त्या च उद्योगांत आहे."

## वैज्ञानिक प्रक्रियेंत भावनेचें काय काम ?

हे गरीबांचे कैवारी एका रिक्षेंत पांच पांच जण बसले होते. त्यांच्या अंतरात्म्याला याबद्दल कांहीं च टोचणी नव्हती. हमालाच्या डोक्यावर सुद्धां त्यांनीं अशा च निर्दयपणानें भरमसाट ओझें लादलें आणि इंटरच्या डब्यांत बसल्यानंतर पैशांच्या बाबतींत त्याच्याशीं बराच वेळ घिस-घिस केली. गरीबांची पर्वा करणें त्यांचें कर्तव्य थोडें च होतें ? दया, सहानुभूति आणि परोपकार यांची सर्व जबाबदारी तर त्यांनीं राज्य-संस्थेवर सोंपवून दिली होती. त्यांचें स्वतःचें हृदय बघाल तर सर्व तऱ्हेच्या मानवी भावनांच्या बाबतींत बिल-कुल रुक्ष वाळवंट आहे. ते खळबळ माजविणारे आहेत, विद्रोही आहेत, युयुत्सु आहेत, परंतु मानवी करुणेशीं त्यांचा जणूं कांहीं च

संबंध नाहीं. त्यांना फक्त संघर्ष हवा. संघर्षांत जे त्यांना साथ देतील ते च त्यांचे 'साथी' होतील. जो 'साथी' असेल तो आपला मित्र सुद्धां असावा, त्याच्याविषयीं आपल्या मनांत प्रेम असावें, या गोष्टीची त्यांना पर्वा नाहीं. वैज्ञानिक प्रक्रियेंत भावनांचें काय काम ?

## परस्परांत सहानुभूतीचा भाव नाहीं

दोन-तीन दिवसांनंतर पुन्हां तसलें च दृश्य दिसलें. त्या च प्रमाणें एका रिक्षेंत पांच जण खच्चून भरले होते. ह्यावेळीं रिक्षेवाला 'बाबू' लोकांना लादून नेत नव्हता, तर ते पांच हि जण कष्ट करणारे आणि त्रस्त असे गरीब होते. ते पण अगदीं बेफिकीर वृत्तीनें रिक्षेवाल्याबरोबर पैशांसाठीं हुज्जत घालीत होते. गरीबीनें त्यांना हृदयहीन बनवून टाकलें होते, त्यांच्या साऱ्या मानवी संवेदनांचा जणूं कांहीं चक्काचूर झाला होता. त्यांना इतर गरीबांच्या सुखदुःखाविषयीं कांहीं च सहसंवेदना जाणवत नव्हती. त्यांची तर ही च तक्रार होती कीं या जगांत श्रीमंत लोक कां असावेत ? रिक्षेवाल्यांत आणि त्यांच्यांत एक च समान धर्म होता आणि तो म्हणजे श्रीमंतांच्या श्रीमंतीचें रक्षण करण्यासाठीं बनलेल्या अर्थ-रचनेला ते तोडूं इच्छित होते, त्या व्यवस्थेच्या कायदा-कानूनांचा आणि नियमांचा भंग करूं इच्छित होते. "हे बघा ! रिक्षेंत पांच पांच माणसें लादून तुमच्या छातीवर मूग भरडणें चाललें आहे." रिक्षेवाल्यांचे सुद्धां हें च म्हणणें आहे. श्रीमंतांच्या विरुद्ध रिक्षावाले आणि त्यांच्या स्वाऱ्या, दोघांची हि तक्रार आहे, दोघे हि श्रीमंतांचे कट्टर शत्रू आहेत, परंतु आपसांत मात्र परस्परांविषयीं कांहीं सुद्धां सहानुभूति नाहीं.

## आपसांत जरासुद्धां निरपेक्ष एकोपा नाहीं

गरीबांचीं डोकीं बिघडलीं आहेत, व श्रीमंतांचा जीव ठिकाणावर नाहीं. आणि म्हणून दोघे हि परिस्थितीचा योग्य विचार करण्यास असमर्थ आहेत. परस्परांविरुद्ध मनांत जी प्रतिक्रिया होते तिला अनुसरून दोघांचा व्यवहार होतो. गरीबां-विरुद्ध सर्व श्रीमंत एक होण्याचा निश्चय करतात; आणि श्रीमंतांविरुद्ध सर्व गरीब एक होण्याचा विचार करतात; परंतु दोघांत हि आपापसांत जरासुद्धां निरपेक्ष एकोपा नाहीं. आणि म्हणून दोघांत केवळ विरोधी भावनेला बळकटी येते, मैत्री आणि सख्य ह्या भावनांचा विकास करण्याची चिंता कोणाला च नाहीं.

मनुष्य-शक्तीच्या रूपांत भांडवलशाहीनें जें कांहीं शिल्लक ठेवलें तें हें आहे. मनोवृत्ति आणि आकांक्षा यांच्या दृष्टीनें श्रीमंत आणि गरीब यांच्यांत कांहीं च फरक नाहीं. श्रीमंत आणि श्रीमंत यांच्यामध्यें स्वार्थासाठीं चढाओढ आणि झगडे आहेत. आणि गरीब-गरीबांत स्पर्धेचा आणि स्वार्थाचा झगडा आहे. ह्यांतून च आम्हांला बंधुत्व आणि समानता याकडे जावयाचें आहे.

## याला क्रांति म्हणतां येत नाहीं

क्रांतीची आवश्यकता आणि घाई कोणाला आहे? श्रीमंतांना कीं गरीबांना? संकटें आणि कष्ट तर गरीबाला च असतात. त्याला क्रांतीची घाई आहे. समाजांत शेंकडा नव्वद टक्के व्यक्ति गरीब आहेत. अशा स्थितींत क्रांतीसाठीं एवढा वेळ आणि इतके सायास यांची जरूर कां असावी? एक होऊं शकतें. भांडवलशाहीचें मूल्य व भांडवलशाही मनोवृत्ति यांचा त्याग गरीबांनीं केलेला नाहीं. मूठभर श्रीमान् त्यांच्या साऱ्या पराक्रमाला

निष्फळ करूं शकतात. श्रीमंतांप्रमाणें च गरीब देखील शोषणाच्या संधीसाठीं टपलेले असतात. श्रीमंताच्याजवळ शोषणाचीं जितकीं साधनें आणि मार्ग आहेत, तितके गरीबांना उपलब्ध नाहींत. ही गरीबाची तक्रार आहे. आणि म्हणून श्रीमंतांविरूद्ध धीटपणें द्रोह करणें तो आपला अधिकार मानतो, आणि त्यांत सामील होण्या-साठीं दुसऱ्या गरीबांना देखील आमंत्रण देतो. यामुळें श्रीमंतांची संपत्ति लुबाडण्याची मनोवृत्ति निर्माण होऊं शकते. परंतु संग्रहाच्या सार्वत्रिक निराकरणाची भावना निर्माण होऊं शकत नाहीं. वाटल्यास याला च द्रोह किंवा बंड हि म्हणा. परंतु क्रांति मात्र केव्हां हि म्हणतां येणार नाहीं.

## शोषणाच्या भावनेचें निराकरण आवश्यक

क्रांतीचा अर्थ आहे, भांडवलशाहीच्या मूल्याचें समूळ उच्चाटण. शंभरांतील पंचाण्णव व्यक्ति गरीब आहेत. त्या जर द्वेष आणि सूडाच्या भावनांची मूर्तिमंत प्रतिमा बनतील तर सारे सामाजिक जीवन विषारी होऊन जाईल. गरीब आपल्या गरीबीच्या निराकरणाच्या प्रक्रियेंत भांडवलशाहीच्या मूल्यांशीं तुलना करूं इच्छितात काय? तर मग त्यांना व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामूहिक जीवनांतून प्रथम शोषणाच्या भावनेचें निराकरण करा-यला हवें. एक गरीब दुसऱ्या गरीबाच्या गरजेपासून फायदा उपटण्याची भावना जोंपर्यंत बाळगील तोंपर्यंत समाजांत शोषणाचीं बीजें राहतील आणि गरीब च त्यांवर नेहमीं सिंचन करीत राहतील, म्हणून ते मूळ धरतील व पालवतील.

देशांतील गरीबांना या मूलभूत विचाराचें शिक्षण देणें फार च आवश्यक आहे.

# परिशिष्ट :

## आम्ही गरीबांकडून जमीन कां मागतों ?

[ विनोबा. ]

आम्ही सर्वांच्याकडून जमीन मागतों याचा असा अर्थ नव्हे कीं आम्ही सर्वांकडून समान जमीन मागतों. जे मध्यम श्रेणी चे किसान आहेत त्यांच्या कडून आम्ही सहावा हिस्सा मागतों. बड्या किसानांना व जमीनदारांना आम्ही म्हणतों कीं तुम्हीं स्वत:साठीं थोडेसें ठेवून बाकी सगळें दान करा. आणि अगदीं गरीब असे किसान, जे देतील तें आम्ही प्रसादरूप मानून ग्रहण करतों. सुदाम्याचे मूठभर पोहे घेऊन जसें भगवान् प्रसन्न झाले होते, तशी च ही भारतमाता गरीबांच्या थोड्याशा दानानें प्रसन्न होईल. कारण तें अल्पसें दान प्रेमाचें एक महान् चिह्न आहे. देशांतील सर्व भूमिहीनांना जोंवर जमीन मिळत नाहीं तोंवर आम्ही मागत राहणार. गरीबांपासून जमीन कां घेतां ? हा प्रश्न वारंवार विचारला जातो, वारंवार उत्तर देण्यांत मला आनंद वाटतो. कारण सहजासहजीं ज्ञानप्रचार होऊन जातो. गरीबांच्या जवळून आम्ही जमीन घेतों त्याचीं चार कारणें आहेत.

### गरीबाचा गरीबासाठीं हि त्याग

(१) आज समाजांत सर्वांत अधिक दु:खी लोक भूमिहीन आहेत. त्यांच्या दारिद्र्याशीं तुलना करतां गरीब किसान देखील सुखी आहेत असें दिसून येईल. खरें म्हणजे जेव्हां आपण कुणाला सुखी किंवा दु:खी म्हणतों तेव्हां तुलना च आपल्याला गृहीत असते. कुणी जर आपल्यापेक्षां गरीब असणाऱ्या व्यक्तीकडे पाहील तर स्वत: सुखी आहोंत असें त्याला वाटेल आणि जर आपल्यापेक्षां सुस्थितींत असणाऱ्याकडे नजर टाकील तर स्वत: दु:खीं आहों असें

दिसून येईल. म्हणून समाजांतील सर्वांत अधिक दुःखी असेल त्याच्यासाठीं प्रत्येकाला थोडा थोडा त्याग केला पाहिजे. समुद्र अगदीं खालच्या पातळीवर आहे; त्यामुळें दुनियेंतील सगळें पाणी समुद्राकडे वाहतें. पहाड-पर्वताचें पाणी व मैदानांतील हि पाणी समुद्राकडे च धांव घेतें. त्या मैदानांतल्या पाण्याला जर आपण म्हणूं लागलों कीं 'तूं तर कांहीं उंच पातळीवर नाहींस, मग कशाला समुद्राकडे धांव घेतोस ?' तर तें पाणी म्हणेल 'समुद्रापेक्षां तर माझी पातळी वरची च आहे ना ? म्हणून तर मी देखील समुद्राकडे धांव घेतों !' या च प्रमाणें श्रीमंतांनीं गरीब भूमिहीनांच्यासाठीं कांहीं ना कांहीं दिलें च पाहिजे हें जसें त्यांचें कर्तव्य ठरतें, तसें च गरीब किसानांनीं आपल्यापेक्षां अधिक गरीब भूमिहीनासाठीं कांहीं द्यावें हें त्याचें कर्तव्य ठरतें; कारण त्यांच्या मानानें भूमिहीन दुःखी च आहे. आणि म्हणून च भूमिहीनासाठीं प्रत्येकानें कांहीं ना कांहीं द्यावें ही प्रत्येकाची जबाबदारी ठरेल ही च गोष्ट आम्हीं शिकवूं इच्छितों. असें न झालें तर ज्यांच्याजवळ कमी जमीन आहे त्यांना कांहीं कर्तव्य पार पाडायचें च नाहीं असें होईल. वस्तुस्थिति अशी नाहीं. प्रत्येकाचें कांहीं ना कांही कर्तव्य आहे च. माझ्याजवळ मला पुरेल इतकी भाकरी नाहीं अशा स्थितींत कोणी अगदीं उपाशी व्यक्ति भाकरी मागायला आली तर माझ्याजवळ जें कांहीं असेल त्यांतला च एक हिस्सा देणें माझें कर्तव्य ठरतें. हा एक धर्म आहे. ही च भावना आम्ही समाजांत आणूं इच्छितों.

## आसक्तीचें निराकरण

(२) अखेर जमिनीवर कुणाची मालकी राहूं नये हें आम्हीं शिकवूं इच्छितों. आज जसा श्रीमंत आपल्याला आपल्या जमिनीचा मालक समजतो, तसा च गरीब हि स्वतःला आपल्या

थोड्याशा जमिनीचा मालक समजतो. दोघे हि स्वतःला जमिनीचे मालक मानतात. आम्ही दोघांना हि या मालकीच्या भावनेपासून मुक्त करूं इच्छितों. तहानेलेल्याला पाणी पाजणें हें जसें आपलें कर्तव्य आहे. तसेंच जो जमीन मागतो त्याला जमीन देणें आपलें कर्तव्य आहे. कारण जमीन ईश्वराची आहे हें आम्ही समजावूं इच्छितों. आज मालकीची भावना श्रीमंत व गरीब दोघांच्या हि ठिकाणीं आहे. तसें तर जंगलांत राहणाऱ्या एकाद्या बुवाजीजवळ ज्या दोन लंगोटया असतात, त्या लंगोटयाविषयीं त्याची, एकाद्या श्रीमंताची आपल्या गठ्ठाभर कपडयाविषयीं आसक्ति असावी, तितकी आसक्ति असते. म्हणून आम्ही सगळयांना आसक्तीपासून मुक्त करूं इच्छितों.

## नैतिक प्रभाव

(३) आम्ही श्रीमंतांच्याजवळ जमीन मागूं म्हटलें तर त्यांच्यावर आमचा कांहीं परिणाम हि झाला पाहिजे. पण परिणाम कसा होणार? आमच्याजवळ कोणती शक्ति आहे? काय आमच्याजवळ पिस्तूल आहे? आमच्याजवळ पिस्तूल हि नाहीं व पिस्तुलाच्या शक्तीवर आमचा विश्वास हि नाहीं. उलट आम्ही असें मानतों कीं, पिस्तुलामुळें कोणतें च काम होत नाहीं. काम बिघडतें मात्र जरूर. म्हणून आम्ही नैतिक शक्ति निर्माण करूं इच्छितों. हजारों गरीब दान देतील तेव्हां नैतिक शक्ति निर्माण होईल व तिचा श्रीमंतांवर परिणाम होईल. आणि हें असें होत आहे हि. प्रथम प्रथम श्रीमान लोक मला टाळत असत, परंतु आतां हजारीबाग जिल्ह्यांत त्यांनीं आम्हांला किती जमीन दिली आहे? त्यांनीं आतां कां दिली जमीन? याचें कारण असें आहे कीं दोन वर्षें झालीं गरीब लोकांनीं दानाचा वर्षाव चालू ठेवला. अखेर

शरम हि कांहीं चीज आहे कीं नाहीं ? आणि जे बेशरम आहेत त्यांच्यासाठीं शरम असणें हि ठीक च आहे. शास्त्रांनीं म्हटलें आहे, "ह्रिया देयम् !" नैतिक शक्ति प्रकट करण्याचा हा एक मार्ग आहे. दिवसानुदिवस आमचें काम श्रीमान लोक उचलून घेतील असा आमचा विश्वास आहे. एक लाख एकर जमीन ज्यांनीं दिली ते राजेसाहेब मला भेटायला आले होते. मी त्यांना म्हणालों ' आपण दान दिलें हें तर ठीक केलेंत पण फक्त एवढ्यानें काम भागायचें नाहीं. आपल्याला तर आपल्या टोळींतील इतरांना देखील दान द्यायला लावलें पाहिजे. त्यांनीं माझें म्हणणें स्वीकारलें आणि हळूं हळूं हे बडे लोक माझें काम उचलून घेतील अशी मला उमेद आहे. कारण गरीबांनीं जें दान दिलें आहे त्यांतून एक नैतिक शक्ति निर्माण होत आहे.

## सत्याग्रही सेनेची खरी शक्ति

(४) मी कित्येकदां म्हटलें आहे कीं आम्ही तर आमची सेना तयार करीत आहोंत. उच्च नीचत्वाचा भेद आम्हांला नष्ट करायचा आहे, आणि अशी सेना उभारायची आहे कीं, जिच्या भरंवशावर आम्ही लढाई लढूं शकूं. ज्यांनीं दान दिलें असेल व त्याग केला असेल आणि ज्यांनीं आपल्या कामाविषयीं सहानुभूति दर्शविली असेल, ते च आमचे सैनिक बनतील. आमची सेना हिंसेची सेना नव्हे. हिंसेच्या सेनेंत ज्यांची बत्तीस इंच छाती असते त्यांना च घेण्यांत येते. परंतु आमच्या सेनेंत दाखल व्हायला त्यागाची छाती पाहिजे. पुढें जर श्रीमंतांचीं मनें वळलीं नाहींत तर आम्हांला आणखी एक पाऊल पुढें जावें लागेल. आज जें करीत आहोंत त्याच्या एक पाऊल हि पुढें जाणार नाही अशी कैद

किंवा मर्यादा आम्हीं ठेवली नाहीं. अशा कैदेवर आमचा विश्वास नाहीं. आमच्यासाठीं तर प्रेमाची शक्ति असली पाहिजे. आई देखील मुलांसाठीं किती त्याग करते ? मुलांसाठीं ती उत्पादन करते. परंतु जेव्हां तिला दिसतें कीं मुलगा वाईट मार्गानें जात आहे व त्याचें तिला दुःख होतें तेव्हां ती काय करते ? ती सत्याग्रह च करते ना ? ती उपवास करते आणि स्वतः त्याला समजावते. दुसऱ्यांना त्रास न देतां स्वतः सहन करणें व समजावणें याचें च नांव सत्याग्रह आहे.

सत्याग्रहाचें नांव घेऊन मी धमकीची गोष्ट करीत नाहीं. सत्याग्रहाचा दुरूपयोग होऊं शकतो व आजकाल होत आहे हें मी जाणतों. परंतु मी असें मानतों कीं, समोरच्या माणसाच्या हृदयाला पाझर फुटावा या साठीं सत्याचें आचरण आग्रहपूर्वक केलें पाहिजे. यासाठीं लागेल तेवढा त्याग करण्याची तयारी म्हणजे च सत्याग्रह होय. माझें असें मत आहे कीं, दुनियेंत एक जरी खरा सत्याग्रही असला तर त्याचा परिणाम सगळ्या दुनियेवर पडेल आणि दुनियेचें हृदय पाझरेल. परंतु त्याच्या मनांत सगळ्या विश्वाविषयीं प्रेम असलें पाहिजे.

## लढाईची गरज राहणार नाहीं.

फक्त पिस्तुलानें च हिंसा होते असें नाहीं. पिस्तुलानें हिंसा होते तशी च उपवासानें देखील होऊं शकते. माझी सेना इतकी जबरदस्त सिद्ध होईल कीं, तिला लढायचें काम पडणार च नाहीं. असा माझा विश्वास आहे. "हुंकारेणैव धनुषा–" तीर सोडायचें हि काम नाहीं. धनुष्याचा टंकार ऐकून च समोरचा खतम होतो, असें म्हटलें आहे. तसें च आमच्या

हुंकारानें च काम होईल. जेव्हां लाखों गरीब दान देतील तेव्हां लढाई न करतां च काम होईल. हजारीबागमध्यें आम्हांला साडेचार लाख एकर जमीन मिळाली. परंतु मी म्हणालों की एवढ्यानें मला संतोष नाहीं. त्या लोकांना मीं साठ हजार दानपत्रें आणायला सांगितलें व त्यांनी तें मान्य केलें. हें मी काय करीत आहें ? भगवानाला जेव्हां गोवर्धन उचलायचा होता, तेव्हां त्यानें सर्वांना सांगितलें कीं आपली आपली काठी त्याच्या खालीं लावा. ही जन-शक्ति निर्माण करण्याची एक बाब आहे, आणि म्हणून आम्ही गरीबांच्या जवळून दान घेतों.

प्रकाशक :
ग्राम सेवा मंडल,
परंधाम विद्यापीठ
पवनार (वर्धा)

प्रति ५०००
मे १९५६
किंमत : चार आणे

मुद्रक :
मोहनलाल भट्ट,
राष्ट्रभाषा प्रेस, वर्धा